सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - ३ रे ❏ अंक - ३०६ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ शनिवार दि. १० जानेवारी २०२६ ❏ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

## ओडिशात भयंकर विमान दुर्घटना ९ जणांना घेऊन जाणारे प्लेन क्रॅश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० भुबनेश्वर**

९ जणांना घेऊन जाणारे विमान ओडिशामध्ये कोसळल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अपघातानंतर घटनास्थळावर एकच हाहाकार उडाला. इंडिया वन या कंपनीचे हे विमान होतं. उड्डाण घेतल्यानंतर काही वेळातच ते जमिनीवर कोसळले. तात्काळ घटनास्थळावर मदतकार्य पोहचवण्यात आलेय. विमानात पायलटसह ९ जण प्रवास करत होते. काहींना वाचवण्यात यश मिळाल्याची माहिती स्थानिक मीडियाने दिली आहे.

ओडिशातील राउरकेला येथील रघुनाथपाली परिसरात इंडिया वन या कंपनीचे एक छोटे विमान कोसळले. प्राथमिक वृत्तानुसार, या अपघातात सहा जण जखमी झाले आहेत. तर तिघांबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. विमानात ९ जण प्रवास करत होते. ६ जखमींना उपचारासाठी तात्काळ जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींमधील दोन ते तीन जणांचा प्रकृती गंभीर असल्याचं समोर आलेय.वाहतूक मंत्र्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त विमान हे ९ आसनी होते. हे विमान भुवनेश्वरहून रुएक्लाला जात होते. उड्डाण घेतल्यानंतर १० किलोमीटरवर पोहचताच विमानात अचानक बिघाड झाला अन् जमिनीवर वेगात कोसळले. विमानात नेमकं काय बिघाड, घोटाळा झाला, याबाबत तपास केला जात आहे. घटनेनंतर जखमींना वाचवण्यात आले आणि उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले. अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरू करण्यात येत आहे.

## कालीचरण महाराज म्हणतात 'भरचौकात त्याचं मुंडकं छाटा'

### तुषार आपटेला स्वीकृत नगरसेवक प्रकरण




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

बदलापूरमधील एका शाळेत दोन चिमुरड्या मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणाने संपूर्ण राज्य हादरले होते. या बहुचर्चित प्रकरणातील सहआरोपी तुषार आपटे यालाच भाजपने कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेत स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्त केले आहे. यावरून विरोधकांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केलाय. आता या प्रकरणावर कालीचरण महाराजांनी देखील संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

आज शनिवारी (दि. १०) नाशिकमध्ये शिवसेना उमेदवारांच्या प्रचारासाठी कालीचरण महाराज नाशिकमध्ये दाखल झाले. यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले आहे. बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपीला भाजपने स्वीकृत नगरसेवक केलं, याबाबत विचारले असता कालीचरण महाराज म्हणाले की, त्याला भर चौकात उभं करून मुंडके छाटले पाहिजे. कालीचरण महाराजांना अर्पण केलं पाहिजे. आरोप सिद्ध होत असतील तर कारवाई झालीच पाहिजे, अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

**जे धर्म रक्षण करतात त्यांना मतदान करा**

नाशिकमधील उमेदवारांच्या प्रचाराबाबत विचारले असता कालीचरण महाराज म्हणाले की, आमचा उद्देश धर्म राज्याचा आहे. जो हिंदू हिताचे आचरण करेल त्याला मतदान करा. दोन असतील तर जो जास्त हिंदू आचरण करेल त्याला मतदान करा. लोकांनी आपापल्या अनुभवावर उमेदवारांना निवडावे. हिंदूंचे विभाजन होत आहे. जे धर्म रक्षण करतात त्यांना मतदान करा, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले.

**हिंदू वोटर करणे हा आमचाच अजेंडा**

बांगलादेशमध्ये हिंदूंवर सातत्याने अत्याचार होत आहेत. याबाबत विचारले असता कालीचरण महाराज म्हणाले की, कोणत्याही देशात हिंदू सुरक्षित नाही. ही स्थिती भारतात देखील होऊ शकते. हिंदूंच्या रक्षणासाठी राजकारणाचे हिंदुकरण करणे महत्वाचे आहे. हिंदू वोटर करणे हा आमचाच अजेंडा आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

**भाजप आणि शिवसेनेला मतदान करा**

जो भारत मातेचा महोत्सव करेल, त्याला मतदान करा. पाकिस्तानचा महोत्सव करेल त्याला नका करू. भाजप आणि शिवसेनेला मतदान करा. गोमाता, मठ, मंदिर, संतांची सुरक्षा करतील त्यांना मतदान करा. जातीवाद करणाऱ्यांना वोट करू नका. हिंदू स्वराज्याचा विडा उचलून काम करायला हवे. जातीवाद, भाषावाद, प्रांतवाद सोडून धर्मध्वज जपण्यासाठी एकत्र यायला हवे. तरच हिंदू सुरक्षित राहतील, असे देखील कालीचरण महाराजांनी म्हटले आहे.

## 'बॉम्बे हे महाराष्ट्राचं शहर नाही'; मुंबईत प्रचाराला आलेल्या भाजपच्या के अण्णामलाईची मुक्ताफळे




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

एकीकडे मुंबई मराठी माणसाची की आणखी कुणाची या मुद्द्यावरून राजकारण तापलं असताना त्यात आता तामिळनाडूतून मुंबईत प्रचारासाठी आलेल्या नेत्याने तेल ओतलं आहे. मुंबईचा उल्लेख बॉम्बे असा करत हे शहर महाराष्ट्राचं नसल्याचं वक्तव्य भाजपचे नेते के अण्णामलाई यांनी केलं. मुंबईच्या व्यवस्थापनेसाठी योग्य लोक बीएमसीमध्ये बसवावी लागतील असंही अण्णामलाई म्हणाले. अण्णामलाईंच्या या वक्तव्यावरुन आता वाद होण्याची शक्यता आहे.

के अण्णामलाई हे तामिळनाडूतील भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष असून ते मुंबईत प्रचारासाठी आले आहेत. भाजपच्या उमेदवाराच्या प्रचारादरम्यान त्यांनी मुंबईबाबत वादग्रस्त वक्तव्य केलं.

के अण्णामलाईल माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले की, मोदीजी हे केंद्रामध्ये आहेत, देवेंद्रजी राज्यामध्ये आहेत आणि मुंबईमध्ये भाजपचा महापौर असेल. कारण मुंबई हे महाराष्ट्राचे शहर नाही, ते आंतरराष्ट्रीय शहर आहे. या शहराचे बजेट हे ७५ हजार कोटी रुपये इतके आहे. चेन्नईचे बजेट हे ८ हजार कोटी तर बंगळुरूचे बजेट हे १९ हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. त्यामुळे मुंबईचे व्यवस्थापन करण्यासाठी तुम्हाला चांगले लोक प्रशासनात बसवावी लागतील.

## आमदार खोपड्यांना खोपडी म्हणजे डोके आहे का? बच्चू कडू यांचा बोचरा सवाल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नागपूर**

पूर्व नागपूर विधानसभा मतदारसंघ गेल्या काही वर्षांपासून भाजपचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. या मतदारसंघातून भाजपचे आमदार कृष्णा खोपडे सातत्याने मोठ्या मताधिक्याने निवडून येत आहेत. मात्र, याच मतदारसंघात येत माजी राज्यमंत्री व प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी महापालिका निवडणुकीत थेट आमदार खोपडे यांना आव्हान दिले.

प्रहार जनशक्ती पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या प्रचारासाठी नागपूरमध्ये आलेल्या बच्चू कडू यांनी शनिवारी माध्यमांशी संवाद साधताना आमदार खोपडे यांच्यावर तीव्र शब्दांत टीका केली. आमदार खोपड्यांना खोपडी म्हणजे डोके आहे का? असा बोचरा सवाल उपस्थित करत त्यांनी खोपडे यांच्यावर प्रहारच्या उमेदवाराला धमकावल्याचा गंभीर आरोप केला. पूर्व नागपूरमध्ये प्रहारचा उमेदवार ताकदीने उभा राहत असल्याने दबावतंत्राचा वापर केला जात असल्याचा दावा कडू यांनी केला.आमदार खोपडे स्वतः आमच्या उमेदवाराविरोधात रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे धमक्या देण्याचे प्रकार सुरू आहेत. मात्र, असे प्रकार आम्ही खपवून घेणार नाही. प्रहारचा उमेदवार घाबरणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. दबाव, धमक्या किंवा प्रशासनाच्या जोरावर निवडणूक जिंकता येत नाही. जनतेची कामे केल्यावरच मतं मिळतात, असेही कडू यांनी ठामपणे सांगितले.

यावेळी त्यांनी नागपूरचे तत्कालीन आयुक्त तुकाराम मुंडे यांच्याशी संबंधित प्रकरणाचा उल्लेख करत आमदार खोपडे यांच्यावर टीकेची झोड उठवली. तुकाराम मुंडे यांनी दिव्यांग सचिव असताना बोगस दिव्यांग लाभार्थ्यांना बाहेर काढले. त्यामुळे त्यांच्या विरोधात प्रशासनाकडे तक्रारी करण्यात आल्या. मात्र, ते आरोप नव्हते, तर केवळ कांगावा होता, असे म्हणत कडू यांनी कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांना लक्ष्य करण्याची प्रवृत्ती सत्ताधाऱ्यांमध्ये असल्याचा आरोप केला.

शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरूनही कडू यांनी राज्य सरकारवर घणाघाती टीका केली. कर्जमाफीसाठी तारीख पे तारीख दिली गेली. सातबारा कोरा करू, योग्य वेळी निर्णय घेऊ, अशी आश्वासने देऊन शेतकऱ्यांची बोळवण करण्यात आली. मात्र, आम्ही सरकारचे नाक दाबले, तेव्हा त्यांना कर्जमाफीची तारीख जाहीर करावी लागली, असा दावा त्यांनी केला.

राजकारणात पद असो किंवा नसो, जनतेसाठीची लढाई सुरूच राहते, असे सांगत कडू म्हणाले, मी सध्या आमदार नाही, तरीही शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी करून दाखवली. त्यामुळे प्रहारच्या उमेदवारांनी घाबरायचे कारण नाही. कुणी धमकावले तर थेट सांगा, आम्ही उत्तर देऊ.

## 'अल्मोंट-किड'सिरपच्या विक्रीवर तात्काळ बंदी घालण्याचे निर्देश

### AL-24002 मधील औषध भेसळयुक्त आणि जीवघेणं असल्याची पुष्टी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नवी दिल्ली**

मुलांच्या आरोग्याशी संबंधित एक अत्यंत गंभीर आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. तेलंगणा औषध नियंत्रण प्रशासनाने मुलांना दिल्या जाणाऱ्या 'अल्मोंट-किड'सिरपच्या विक्रीवर तात्काळ बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत. या सिरपमध्ये 'इथिलीन ग्लायकॉल' नावाचं अत्यंत विषारी केमिकल आढळल्याचं विभागाने एका डव्हायझरीमध्ये म्हटलं आहे.

कोलकाता येथील केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटनेच्या लॅब रिपोर्टनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. बिहारमधील 'ट्रिडस रेमेडीज' या कंपनीने उत्पादित केलेल्या बॅच नंबर AL-24002 मधील औषध भेसळयुक्त आणि जीवघेणं असल्याची पुष्टी या अहवालात करण्यात आली आहे. सामान्यतः हे सिरप मुलांमधील लर्जी, 'हे फिव्हर' आणि अस्थमाच्या उपचारांसाठी डॉक्टरांकडून लिहून दिलं जातं.

तपासणीदरम्यान या सिरपमध्ये इथिलीन ग्लायकॉलचं प्रमाण ठराविक मानकांपेक्षा खूप जास्त असल्याचं दिसून आलं. तज्ज्ञांच्या मते, इथिलीन ग्लायकॉल हे एक औद्योगिक द्रावण आहे, ज्याचा वापर अँटी-फ्रीझ आणि कूलंट तयार करण्यासाठी केला जातो. हे केमिकल शरीरात गेल्यास किडनीचं गंभीर नुकसान होऊ शकतं, मज्जासंस्थेवर परिणाम होऊ शकतो आणि विशेषतः मुलांसाठी ते प्राणघातक ठरू शकते.

## चांदूर बाजार पालिकेचा कोण होणार उपाध्यक्ष, जुन्या कार्यकर्त्यांना संधी; स्वीकृत नगरसेवक पदासाठी अजय मलिये यांच नाव निश्चित




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०चांदुर बाजार**

चांदुर बाजार नगरपालिके मध्ये २ स्वीकृत सदस्यांच्या निवडीसाठी चढाओढ सुरू आहे तर प्रहारचे जुने कार्यकर्ते अजय मलिये यांचं नाव निश्चित झाल्याची माहिती मिळत आहे तर एक नाव निश्चित करण्यासाठी चढाओढ सुरू आहे नगर उपाध्यक्ष कोण निवढला जाणार ही चर्चा मात्र रंगत चाललेली आहे येत्या १३ जानेवारीला या चर्चेला पूर्णविराम लागणार आहे निवडणूक निकालानंतर २५ दिवसांच्या आत होणाऱ्या पहिल्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पूर्ण करावी लागते हा कालावधी १६ जानेवारी रोजी संपत असल्याने त्यापूर्वीच बैठकांचे आयोजन केले जात आहे चांदूर बाजार पालिकेमध्ये मंगळवार १३ जानेवारी रोजी पहिली बैठक निश्चित झाली असून निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नवनिर्वाचित नगराध्यक्षांना ही पहिली बैठक बोलवावी लागते आणि त्यांच्याच अध्यक्षतेखाली ती पार पडते या बैठकीत उपाध्यक्ष आणि संख्याबळाच्या आधारे स्वीकृत नगरसेवकांची निवड केली जाते तर प्रहार पक्षाच्या नगराध्यक्षा मनीषा मनीष नांगलीया सह एकतर्फे बहुमत असल्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सोपवीला आहे त्यामुळे प्रहारचे २ स्वीकृत सदस्यांची निवड होणार किराणा व्यवसायिक प्रहारचे जुने कार्यकता अजय मलिये यांचा पाहिलं नाव समोर आल असून १ नाव मात्र समोर यायचं आहे इच्छुक प्रहार उमेदवारांची मोठी यादी लागली परंतु नावे निछित झाल्याची माहिती विश्वस्नीय सूत्राकडून मिळत आहे प्रहार चे अध्यक्ष बच्चु कडु नेमकी काय भूमिका घेणार कोणत्या कार्यकर्त्याला संधी देणार याची चर्चा सुरु आहे स्वीकृत सदस्यांसाठी १० नगरसेवकांमागे एक असे सूत्र आहे प्रत्येक नगरपालिका सभागृहाची सदस्य संख्या एकने वाढवण्यात आली असून हे वाढीव सदस्य म्हणजे शहराच्या नगराध्यक्षा मनीषा नांगलीय हे आहेत या सूत्रानुसार पालिकेत २ स्वीकृत नगरसेवक निवडले जातील चांदूर बाजार नगरपालिकेची पहिली बैठक येत्या मंगळावर १३ जानेवारी रोजी होणार असून त्यासाठीची नोटीस पाठवण्यात आली आहे नगराध्यक्षांनी बोलावलेली पहिली सर्वसाधारण सभा कोणत्याही परिस्थितीत तहकूब करता येणार नाही अशी स्पष्ट सूचना सभेच्या नोटीसमध्ये सर्व सदस्यांना देणे बंधनकारक आहे जिल्हाधिकाऱ्यांद्वारे प्राधिकृत अधिकाऱ्यांकडून पात्र नामनिर्देशित उमेदवारांची यादी सभेपूर्वी प्राप्त झाल्यास अशा सदस्यांची नावे बैठकीत वाचून दाखवण्यात येतील पहिल्या सभेची नोटीस संबंधित नगरसेवकांना किमान सात दिवसांपूर्वी पाठवणे अनिवार्य आहे राज्य शासनाच्या नगर विकास विभागाच्या २१ डिसेंबर २०१६ च्या नियमानुसार ही बैठक आयोजित केली जाते या नियमात उपाध्यक्षांच्या निवडीसंदर्भातील तरतूद नमूद आहे मात्र चांदूर बाजार नगर पालिकेत कुणासमोर उपाध्यक्ष पदाच नाव लागणार हे अध्यापही स्पष्ट झाले नाही या निवडणुकीसाठी नगराध्यक्षा मनीषा नांगलीया हेच पिठासीन अधिकारी म्हणून काम पाहतील.

### प्रहारच्या जुन्या कार्यकर्त्यांना संधी मिळणार

प्रहार पक्षात अनेक जुने कार्यकर्ते असतांना नवख्या कार्यकर्त्यांला संधी मिळणार नसल्याच बोल्या जात आहे गेल्या २० वर्षांपासून प्रहार पक्षात काम करित असलेल्या अजय मलिये यांना स्वीकृत सदस्य पदाची लॉटरी लागली आहे तर एका नावाच्या निवडीसाठी अनेक शहरातील कार्यकर्ते प्रहारचे अध्यक्ष माजी आमदार बच्चु कडू यांची वारंवार भेट घेत आहे तर कार्यकर्ते लाईन मध्ये लागले असून मात्र बच्चू कडूंना सुद्धा स्वीकृत सदस्यांची निवडणूक डोके दुखी ठरत असल्याच बोलल्या जात आहे.

### निवडीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले आहेत

या निकषांमध्ये पालिकेचे ज्ञान आणि अनुभव असलेल्या व्यक्तींचा समावेश आहे जसे की माजी लोकप्रतिनिधी, शिक्षण तज्ज्ञ, डॉक्टर, वकील, मुख्याध्यापक, निवृत्त प्राध्यापक, सनदी लेखापाल, अभियांत्रिकी पदविकाधारक, विधी शाखेचे पदवीधारक, निवृत्त मुख्याधिकारी किंवा मनपा आयुक्त आणि पालिका क्षेत्रातील अशासकीय संघटनेचे पदाधिकारी असणे गरजेचं मानल्या जात आहे.

## फडणवीसांनी 'मातोश्रीवरील टीका करणं बंद करा तर मातोश्रीचे दरवाजे उघडतील - उद्धव ठाकरे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

राज्यात महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. एवढंच नाही तर महायुतीमधील नेतेही एकमेकांच्या विरोधात टीका करताना दिसत आहेत. असं असतानाच माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका मुलाखतीत बोलताना आपल्यासाठी उद्धव ठाकरे यांनी 'मातोश्री'चे दरवाजे बंद केल्याचं भाष्य केलं होतं. त्यावर आता उद्धव ठाकरे यांनी भाष्य केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासाठी'मातोश्री'चे दरवाजे बंद आहेत का? याबाबत विचारलं असता उद्धव ठाकरे यांनी सूचक भाष्य केलं. 'मातोश्रीवरील टीका करणं बंद करा, तर मातोश्रीचे दरवाजे उघडतील', असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बोलत होते.

**उद्धव ठाकरे काय म्हणाले ?**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल एका मुलाखतीत बोलताना म्हणाले की, महापालिका निवडणुकीनंतर राज ठाकरे यांनी जर मला चहा प्यायला बोलावलं तर मी जाईन किंवा ते माझ्या घरी येतील. मात्र, उद्धव ठाकरेंनी 'मातोश्री'चे दरवाजे माझ्यासाठी २०१९ मध्येच बंद केले आहेत, असं फडणवीस यांनी म्हटल्याबाबतचा प्रश्न उद्धव ठाकरे यांना विचारण्यात आला.

या प्रश्नावर उत्तर देताना उद्धव ठाकरे म्हणाले की, असं अजिबात झालेलं नाही. एवढी माणुसकी विसरणारा मी नाही. मात्र, तुम्ही मातोश्री बदनाम करण्यासाठी निघाला आहात. तुम्ही मातोश्रीवर वाट्टेल ते आरोप करता. ते तोंड तुम्ही बंद करा, मग 'मातोश्री'चे दरवाजे उघडतील, असं मोठं वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी केलं आहे.

'मातोश्री'चे दरवाजे उघडतील हे मी एवढ्यासाठीच म्हणत आहे की त्यांनी बकवास करणं बंद करावं. मातोश्रीला बदनाम करण्याचं काम बंद करावं, आमची कौटुंबिक बदनामी देखील बंद करावी, कारण मी कधीही कोणाची कौटुंबिक बदनामी केली नाही. माझ्याकडे माहिती असून देखील मी कोणाची कौटुंबिक बदनामी केली नाही आणि कधी करणार देखील नाही, असंही उद्धव ठाकरे म्हणाले.

## संपादकीय ......

# भारताची चिंता पाचशे पटीने वाढणार

*रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांविरोधात ५०० टक्क्यांपर्यंत आयातशुल्क (टॅरिफ) लावण्यासंबंधीच्या विधेयकाला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी तत्वत: मंजुरी दिली आहे. 'सँक्शनिंग रशिया ॲक्ट' नावाचे हे विधेयक पुढच्या आठवड्यात अमेरिकेच्या संसदेत अर्थात काँग्रेसमध्ये मांडले जाईल. या विधेयकाला डेमॉक्रॅट आणि रिपब्लिकन अशा सत्ताधारी व विरोधी पक्षातील ८४ जणांचा पाठिंबा असल्याचे म्हटले जाते. त्यामुळे हे विधेयक बहुमताने काँग्रेसमध्ये मंजूर होण्याची चिन्हे आहेत. हे विधेयक मंजूर होताच भारताची चिंताही पाचशे पटीने वाढणार आहे. २०२२ च्या फेब्रुवारी महिन्यात रशिया-युक्रेन युद्धाला सुरुवात झाली होती. यंदाच्या फेब्रुवारीत दोन्ही देशांमधील या युद्धाला ४ वर्षे पूर्ण होतील. तरीही हे युद्ध थांबण्याची चिन्हे नाहीत. चार वर्षांपूर्वी युद्धाला तोंड फुटताच टिकलीएवढ्या युक्रेनला नमवायला रशियाला ४ दिवसही पुरेसे ठरतील, असे म्हटले जात होते. प्रत्यक्षात घडले उलटेच. रशियन सैन्य युक्रेनच्या सीमेलगतच्या प्रत्येक शहरांत मुसंडी मारत असताना युक्रेनचे सैन्य प्राणपणाने लढत होते.*

*युक्रेनचा पाडाव झाल्यास रशिया युरोपच्या तोंडावर मांडी घालून बसण्याच्या भीतीने अमेरिका आणि युरोपियन देशांनी युक्रेनला युद्धसामुग्री आणि आर्थिक रसद पुरवठा सुरू केला, तसे युक्रेनियन सैन्यानेही चिवट संघर्षाच्या जोरावर रशियन सैन्याला अनेक भागांतून हुसकावून लावले. याच दरम्यान रशियाचे आर्थिक खच्चीकरण करण्याच्या उद्देशाने अमेरिकेसह युरोपियन देशांनी रशियावर ५०० हून अधिक निर्बंध लादले, व्यापारी संबंध तोडले, अनेक देशांमधील रशियाची बँक खाती गोठवण्यात आली. आर्थिक नाकेबंदी केल्यावर रशियाची युद्धखोरी कमी होईल, असा अमेरिकेचा कयास होता. मात्र, एवढे करूनही रशियन सैन्य नमलेले नाही, उलट युक्रेनवरील हल्ले दिवसेंदिवस तीव्र होत चाललेत. यामागे रशियन कच्चे तेल, नैसर्गिक वायू, युरेनियम व रेअर अर्थ मटेरियलचा मोठा हात असल्याचे म्हटले जात आहे.*

*जेव्हापासून हे युद्ध सुरू झाले, तेव्हापासून रशियाने मित्र राष्ट्रांना अत्यंत स्वस्त दरात कच्चे तेल आणि नैसर्गिक वायूचा पुरवठा करायला सुरुवात केली. यामध्ये प्रामुख्याने चीन, भारत, ब्राझील व आफ्रिकेतील काही देशांचा समावेश आहे. शिवाय हा व्यापारही अमेरिकन डॉलरऐवजी रशियाचे चलन रुबल किंवा त्या त्या स्थानिक देशाच्या चलनात होऊ लागला. या देशांनी रिफाइन केलेले कच्चे तेल आणि नैसर्गिक वायू खुद्द युरोपियन देश विकत घेऊन आपल्या इंधन गरजा भागवत होते. तर दुसरीकडे अमेरिकाही रशियाकडून युरेनियम आणि रेअर अर्थ मटेरियल विकत घेतच होता.*

*या देशांनी भारतावर रशियाकडून कच्चे तेल विकत घेण्याचा ठपका लावताच भारत आणि रशियाने वेळोवेळी ही दुटप्पी भूमिका उघड केली. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांना मिरच्या झोंबणे स्वाभाविकच होते. ट्रम्प यांना जागतिक शांतीदूत म्हणवून घ्यायची केवळ खुमखुमीच नाही, तर गळ्यात शांततेचे नोबेल पारितोषिक लटकवण्यासाठी त्यांची सातत्याने धडपड सुरू आहे. त्यातून त्यांनी भारत-पाक संघर्ष थांबवल्याचा दावा केला होता. गाझा-इस्रायल युद्ध, इस्रायल-इराण युद्ध, कंबोडिया-थायलंड युद्धही मीच थांबवले असे ते अधूनमधून सांगत असतात. अर्थात भारताने त्यांच्या दाव्यांना किंमत न दिल्याने ते भारतावर खार खाऊन आहेत. आपण सत्तेत येताच पाचव्या मिनिटाला रशिया-युक्रेन युद्ध थांबवू अशी पुडी त्यांनी सोडली होती. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून ट्रम्प यांनी आतापर्यंत अनेक शांतीचर्चा केल्या. व्लादिमिर पुतीनची भेटही घेतली, तरी त्यांना युद्धाचा गुंता सोडवण्यात यश आलेले नाही. हेच अपयश ट्रम्प यांना सातत्याने ठसठसत असून याचा दुहेरी राग ते भारतावर काढत आहेत.*

*डोनाल्ड ट्रम्प हे पक्के बिझनेसमन. त्यामुळे आपल्या अटीशर्तींवर प्रत्येक देशाने द्विपक्षीय व्यापार करार करावा यासाठी त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार कराराचे उल्लंघन करत मनमानी पद्धतीने अनेक देशांवर टॅरिफ लादले. ज्यामध्ये भारताचाही समावेश आहे. भारतावर ट्रम्प प्रशासनाने व्यापार तुटीसाठी २५ टक्के, तर रशियाकडून कच्चे तेल विकत घेतल्यावरून अतिरिक्त २५ असा एकूण ५० टक्के टॅरिफ लादला. या टॅरिफच्या भीतीने ऑस्ट्रेलिया, जपानसारख्या काही देशांप्रमाणे भारतही झुकेल असे ट्रम्प यांना वाटत होते. परंतु, भारत अजूनही या दबावाला बळी पडलेला नाही. भारताने ट्रम्प यांच्या नाकावर टिच्चून डेअरी-फिशरी प्रॉडक्ट, ज्वेलरी, कृषी उत्पादने आदींसाठी पऱ्यायी बाजारपेठा शोधल्या. इंग्लंडपाठोपाठ ओमान, न्यूझीलंडसोबत द्विपक्षीय मुक्त व्यापार करारही केला. एवढेच नाही, तर वर्षअखेरीस पुतिन यांचा दौरा आयोजित करून त्यांच्यासोबत अनेक व्यापारी करार भारताने केले, त्यामुळे ट्रम्प यांची पोटदुखी वाढली आहे. त्यामुळेच आता ते भारतावर ५०० टक्क्यांपर्यंत टॅरिफ लादण्याच्या तयारीत आहेत.*

*आतापर्यंत ५० टक्के टॅरिफ भारताने कसाबसा सहन केला, परंतु ५०० टक्के टॅरिफ म्हणजे डोक्यावरून पाणी जाणार आहे. भारतासाठी हा अत्यंत कसोटीचा काळ असणार आहे. भारताने रशियाकडून स्वस्त दरात कच्चे तेल विकत घेऊन ते आंतरराष्ट्रीय बाजारात विकण्याची प्रक्रिया शासकीयपेक्षा खासगीच अधिक होती. त्याचा फायदा खासगी तेल कंपन्यांनाच झाला. भारतात ना पेट्रोल-डिझेल स्वस्त झाले ना सीएनजी-पीएनजी. मागच्या दोन महिन्यांमध्ये भारताने रशियाकडून होणाऱ्या तेलाच्या आयातीत कपात केलीय खरी, पण ती तितकी आश्वासक नाही. भारतीय अर्थव्यवस्थेला अमेरिकेच्या दणक्यापासून वाचवायचे असेल तर रशियाकडील तेल खरेदी हळूहळू बंद केल्यावाचून पर्याय नाही. कारण एका हट्टापायी अनेक भारतीय उद्योगधंदे व प्रामुख्याने अमेरिकेसोबतचा द्विपक्षीय व्यापार करार धोक्यात येऊ शकतो. भविष्यात मोठी आर्थिक झेप घ्यायची असेल तर भारतासाठी दोन पावले मागे घेण्यातच शहाणपण आहे.*

# महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेन्द्रजींचा झंझावात

स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वात दिनांक ६ एप्रिल १९८० रोजी मुंबई येथे स्थापन झालेला भारतीय जनता पक्ष आज मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष झाला आहे. महात्मा गांधींना अपेक्षित असलेला समाजवाद, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे अंत्योदयाचे स्वप्न आणि एकात्म मानववाद आणि सांस्कृतिक राष्ट्रवाद या त्रिसूत्रीवर आधारित पक्षाची कार्यपद्धत असून राष्ट्रनिर्मितीच्या मार्गावर पक्षाची यशस्वी वाटचाल सुरु आहे.

सामान्यातून नेतृत्वनिर्मिती हे भारतीय जनता पक्षाच्या यशस्वीतेचे गमक आहे. ' केवळ भारतीय जनता पक्षातच सामान्य कार्यकर्ता पक्षाचा अध्यक्ष होऊ शकतो' हे पक्षाध्यक्ष पद स्विकारल्यावर मा. ना. श्री. नितीन गडकरी, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि जहाज मंत्री यांचे उद्गार आजही समर्पक आहेत. भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १ लाख युवकांना राजकारणात येण्याचे आवाहन केले होते ते मुळातच देशात भविष्यात नेतृत्व निर्माण व्हावे यासाठीच.

नुकत्याच पार पडलेल्या २४६ नगरपरिषद आणि ४२ नगरपालिका अशा एकूण २८८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निकालात देवेद्रजींच्या सर्वसमावेशक नेतृत्वाचा झंजावात पाहायला मिळाला. महाराष्ट्राच्या राजकारणात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व असते. विशेषतः नगर परिषद निवडणुकांकडे राज्याच्या राजकीय भविष्याची 'लिटमस टेस्ट' म्हणून पाहिले जाते. या निवडणुकांमध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने मिळवलेले यश हे केवळ आकड्यांचे गणित नसून, ते त्यांच्या राजकीय चातुर्याचे आणि संघटनात्मक कौशल्याचे प्रतीक मानले जाते. नगरपालिका निवडणूकीत २८८ पैकी ११७ अधिक नगराध्यक्ष आणि ६८५१ जागांपैकी २४३१ नगरसेवक निवडून येणे ही केवळ एक संख्या नसून देवेन्द्रजींच्या सर्वसमावेशक नेतृत्वाला जनतेची असलेली पसंती आहे. नागपूर जिल्ह्यात २७ पैकी २२ नगराध्यक्ष निवडून देऊन नागपूरकरांनी त्यांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब केले आहे. या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाचा विजयाचा स्ट्राईक रेट ४५ टक्के आहे. कोंकण विभागात निवडणूक झालेल्या २५ नगरपालिकांमध्ये १९ नगराध्यक्ष आणि ६१५ पेक्षा अधिक नगरसेवक निवडून आले असून या विभागात विजयाचा स्ट्राईक रेट सर्वोच्च म्हणजेच ७६ टक्के इतका आहे. विदर्भात ११३ नगरपालिकांमध्ये ५३ नगराध्यक्ष आणि १२०० पेक्षा अधिक नगरसेवक (४७ टक्के ) मराठवाड्यात ५२ पैकी १८ नगराध्यक्ष आणि ४५० पेक्षा अधिक नगरसेवक (३४.६१ टक्के), पश्चिम महाराष्ट्रात ५१ पैकी १९ नगराध्यक्ष आणि ५१० पेक्षा अधिक नगरसेवक (३७.२५ टक्के), खान्देशात ४७ पैकी २१ नगराध्यक्ष आणि ५५० पेक्षा अधिक नगरसेवक (४४.६१ टक्के) विजयी झाले आहेत. देवेन्द्रजींच्या नेतृत्वात राज्याच्या सर्व सर्वच भागात भाजपचा विस्तार झाला आहे. भारतीय जनता पक्ष हा विशिष्ट समाजाची मक्तेदारी आहे, देवेन्द्रजी ३.५ टक्के मतदारांचे प्रतिनिधित्व करतात, पक्षाची विचारधारा दलित विरोधी आहे हा विरोधकांचा भ्रामक आणि खोडसाळ अपप्रचार या निवडणूकीत मतदारांनी धडकावून लावला आहे. पक्षातर्फे निवडून आलेल्या उमेदवारांमध्ये १९ नगराध्यक्ष आणि ५४० नगरसेवक अनुसूचित जातीचे तर ११ नगराध्यक्ष आणि २९० नगरसेवक अनुसूचित जमातीचे आहेत यावरून देवेन्द्रजींच्या नेतृत्वाला जाती धर्माची मर्यादा नाही हे सिद्ध होते. अचूक उमेदवाराची निवड, नियोजनबद्ध प्रचार,



पक्षाची ध्येयधोरणे सामान्य मतदारांपर्यंत पोहचवण्यासाठी व्यक्तिश घेतलेली मेहनत, शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचे दृश्य परिणाम आणि देवेन्द्रजींच्या अभ्यासू, परिश्रमी, निरागस नेतृत्वाची भुरळ यातूनच हा विजय साकारला आहे.

राजकारण हा फावल्या वेळात करायचा उद्योग नसून तो दैनंदिन कर्तव्याचा भाग आहे हे लोकमान्य टिळकांचे वचन देवेन्द्रजींच्या बाबतीत चपखल लागू पडते. २०१९ साली स्पष्ट बहूमत मिळवूनही व्यक्तीद्वेशी राजकारणामुळे त्यांना विरोधीपक्ष नेतेपद स्विकारावे लागले, २०२२ मध्ये पक्षादेश शिरोधार्य मानून त्यांनी उपमुख्यमंत्री स्विकारले आणि लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये अपेक्षेपेक्षा कमी जागांवर मिळालेला धक्कादायक विजय या घटनांमधून देवेन्द्रजी खचले नाहीत. पक्षाने दिलेल्या प्रत्येक जबाबदारीला त्यांनी सर्वार्थाने न्याय दिला. कोरोना महामारीच्या काळात सत्ताधारी पक्षांतील नेत्यांपेक्षा विरोधी पक्ष नेता म्हणून त्यांनी सक्रिय भूमिका निभावली. प्रत्येक जिल्ह्याला भेटी देऊन उपलब्ध वैद्यकीय सुविधांचा आढावा घेतला, कुठे मदत तर कुठे सरकारला सल्ला दिला. आणीबाणीच्या काळात विरोधी पक्ष नेता कसा असावा, याचा प्रत्यय त्यांनी आणून दिला. देवेन्द्रजींच्या संकल्पनेतून आकारास आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण आणि मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना विधानसभा निवडणुकीच्या काळात गेम चेंजर ठरल्या होत्या. विधानसभा निवडणूकीत झालेल्या पराभवाने खचलेला विरोधी पक्षाकडे देवेन्द्रजीसारखा राखेतून उसळी घेणारा नेता आणि सर्वसामान्य जनतेला स्विकृत असे ध्येयधोरण नाही हेच त्यांच्या अपयशाचे प्रमुख कारण आहे असेच म्हणावे लागेल. राज्याच्या इतिहासात सलग तीन विधासभा निवडणुकांमध्ये १०० पेक्षा अधिक सदस्य निवडून आणणारे देवेन्द्रजी एकमेंव नेते आहेत. विधानसभा निवडणूकीत २३२ सदस्यांचे पाठबळ घेऊन सत्तास्थापन करणारे देवेन्द्रजी एकमेव मुख्यमंत्री आहेत. २०१४ पासून मधला अडीच वर्षाचा कालखंड वगळता देवेन्द्रजी सत्तेत आहेत. या काळात राज्य सर्वच आघाड्यांवर प्रगतीपथावर अग्रेसर होत असल्याचे जनतेने अनुभवले आहे. जलयुक्त शिवार अभियान, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प, मुंबई, पुणे , नागपूर आणि ठाणे महानगरात विस्तारलेले मेट्रोचे जाळे, गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व, स्वतंत्र इतर मागासवर्ग खाते, मराठा समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी सारथी संस्था, ४४००० मेगावॅटपेक्षा अधिक वीज निर्माण करुन देशातील सर्वात जास्त उर्जा निर्माण करणारे राज्य, तरते सौर उर्जा प्रकल्प, सेवा हमी कायदा, वारकरी विमा, महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४, शून्य नक्षलवाद अशा अनेक जनहिताच्या योजना राबवणारे देवेन्द्रजी आज राज्यातील सर्वसामान्य नागरिकांचे आशास्थान आहेत. एकट्या भारतीय जनता पक्षाचे सरकार स्थापन करण्यास बोटावर मोजण्याइतक्या सदस्यांची आवश्यकता असूनही मा. श्री. एकनाथजी शिंदे आणि मा. श्री. अजितदादा पवार या अनुभवी नेत्यांसोबत महायुतीचे सरकार स्थापन करणारे देवेन्द्रजी आघाडी धर्म पाळणारे, वचनाचे पक्के, विशालहृदयी आणि गुणग्राहक आहेत. आपल्या राजकीय कार्यकाळात १९९१ ते आजतागायत देवेन्द्रजी जनतेच्या न्यायालयात कायम अपराजित राहिले आहेत. एकीकडे दूरदृष्टी, नियोजन, अहोरात्र परिश्रम, दांडगा जनसंपर्क आणि राज्याच्या विकासाचे मॉडेल जनतेसमोर घेऊन जाणाऱ्या देवेन्द्रजींचा झंजावात आणि दुसरीकडे मतदान यंत्र हॅकिंग, मत चोरी, मुंबई वेगळी करण्याचा डाव या मुद्यावर गोंधळलेले विरोधक असा सामना भविष्यातील निवडणूकीत असणार आहे त्यामुळे आगामी महानगरपलिका आणि जिल्हा परिषद निवडणूकीतही जनतेचे असेच विशुद्ध प्रेम आणि आशीर्वाद राज्याच्या विकासासाठी देवेन्द्रजींच्या पाठीशी असतील यामध्ये कोणतीही शंका नाही.स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाहीच्या शाळा मानल्या जातात.



नागपूर महानगर पालिकेच्या सदस्य म्हणून आपल्या राजकीय आयुष्याचा प्रारंभ करणारे देवेंद्रजी आज राज्याचे मुख्यमंत्री आहेत. धामणगाव रेल्वे नगरपरिषदेवर २०१६ साली प्रत्यक्ष जनतेतून निवडून येऊन नगराध्यक्ष झाल्यावर मला सलग दोन वेळा विधानसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी जनतेने मला दिली आहे. देवेन्द्रजींच्या नेतृत्वात प्रत्यक्ष जनतेतून निवडून आलेले नगराध्यक्ष भविष्यात राज्याच्या तसेच देशाच्या राजकीय इतिहासात आपले स्थान निर्माण करतील अशी अपेक्षा व्यक्त करण्यास हरकत नाही.

**प्रताप अरुणभाऊ अडसड**

(लेखक भारतीय जनता पक्षाचे धामणगाव रेल्वे मतदार संघाचे आमदार आहेत.)

# भाऊ बिनइरोध निवडून आलाय...

निवडणुका जर शांततेत पार पाडायच्या असतील तर त्या बिनविरोध झाल्या पाहिजेत. साहित्य संमेलनांना जे जमले नाही ते या वर्षीच्या महापालिका निवडणुकांमध्ये जमून आले. किती समजूतदारपणा म्हणायचा? अगदी एखादा प्रियकरसुद्धा आपल्या प्रेयसीला पत्र लिहिताना- 'के तुम नाराज ना होना...' म्हणत घाबरत घाबरत पत्र लिहित असतो; परंतु या खेपेला चांगले सत्तरच्यावर बिनविरोध निवडून आलेले हे कार्पोरेटर म्हणजे कट्टर प्रेमवीरच म्हणायला पाहिजेत.

त्यापैकीच एक आमचे भाऊ बिनविरोध निवडून आलेले! अजून मतदान नाही, मतमोजणी नाही तोवर आमचे भाऊ निवडून आले. रे माझ्या कर्मा, हे कसे काय घडले? भाऊंचे कार्यकर्ते म्हणीत होते की, 'यिवून यिवून येणार कोण आणि भाऊशिवाय हाय कोण?' पण अशाप्रकारे भाऊ निवडून येतील, असे कुणाला वाटत नव्हते. खरं तर रितसर निवडणूक तरी हुयाला पाहिजे हुती. निवडणुकीशिवाय मज्जा नाही. हेच्या परास अवकाळी पाऊस बरा. द्राक्षे गेली तरी डाळिंबं तरी मागं र्हात्यात. भाऊनं मात्र सगळ्यांचा अगदी सुपडासाफ केला.

बाकी भाऊची ताकद मोठी म्हणा. दिसायला अगदी गव्यासारखा तगडा आणि त्याची कोयता ही त्याची निशाणी बघून निम्मे उमेदवार घरात जाऊन बसले. त्यात भाऊ उघडे बाबांचे भक्त!




उघडेबाबांनी भाऊंच्या विरोधातले अकरा उमेदवार अक्षरशः उघडे पाडले. अंदरकी बात वेगळीच हाये म्हणतात. भाऊंनी थेट उमेदवारांबरोबरच सौदा केला. म्हणजे मतदाराला प्रत्येकी पाच-दोन हजार, कोंबडी-क्वार्टर द्यायची, अपार्टमेंटी रंगवून द्यायच्या... त्या परास डायरेक्ट उमेदवारच ताब्यात. हा फंडा यंदाच सुचला तोही भाऊंना! 'मातीविना शेती तसे निवडणुकीविना कार्पोरेटर!' आता हा पॅटर्न विदर्भ मराठवाड्यातही गाजणार म्हणतात.

ईव्हीएम विनाकारण बदनाम झालं. दहा-बारा जेसीबी सांगितल्यात भाऊंच्या विजयी मिरवणुकीला! भाऊंच्या गळ्यात जेसीबीने हार घालणार आहेत. बॉलीवूडचा हिरो मिरवणुकीत नाचायला येणार म्हणतात. भाऊंचा डायलॉग प्रसिद्ध आहे, 'मैं जो बोलता हूँ वो मैं करता हूँ और जो नहीं बोलता हूँ वो भी करता हूँ...' सगळेच बिनविरोध विजयी कार्पोरेटर भाऊंच्या सारखे असतीलच असे नाही; परंतु बिनविरोध कार्पोरेटर हा भविष्यात राष्ट्रीय नारा ठरू शकतो..

# रब्बी ज्वारीवर मावा, चिक्का रोगाचा प्रादुर्भाव झालायं, कृषी विभागाने दिले आवाहन



बाळदसह पाचोरा तालुक्यातील परिसरात रब्बी हंगामातील ज्वारी पिकावर मावा व चिक्का रोगाचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव दिसून येत आहे. ऐन निवडीवर व परिपक्वतेच्या टप्प्यावर असलेल्या ज्वारीवर या रोगाचे आक्रमण झाल्याने उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

गेल्या पंधरा दिवसांपासून वातावरणात होत असलेल्या बदलांमुळे ज्वारी पिकावर मावा व चिक्का रोगाचा प्रादुर्भाव वाढला आहे. सकाळी थंडगार वातावरण, तर दिवसा अचानक वाढणारे तापमान यामुळे या रोगाचा प्रसार झपाट्याने होत आहे. अनेक शेतकऱ्यांनी महागड्या कीटकनाशकांची फवारणी केली असली तरीही या रोगावर अपेक्षित नियंत्रण न मिळाल्याने काही ठिकाणी ज्वारीची पाने पिवळी पडताना दिसत आहेत.

निसर्गाच्या लहरीपणामुळे कोणत्या हंगामात कोणते पीक घ्यावे हेच कळेनासे झाले आहे. कारण आता तिन्ही ऋतुमान बिघडून गेले आहे. गेल्यावर्षी खरीप हंगाम जेमतेम आला आणि आता रब्बी पिकांवरही रोगाचा फटका बसत आहे. रब्बी हंगामाकडून असलेल्या आशाही आता मावळत चालल्या आहेत.

कोरडवाहू रब्बी ज्वारी पोटरीत असताना पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी पाणी द्यावे. दोन पाणी देणे शक्य असल्यास पिकाच्या दोन्ही (गर्भावस्था व पोटरी अवस्था नाजूक अवस्थेत ज्वारीला पाणी द्यावे. पेरणीनंतरचे केलेल्या ओलावा व्यवस्थापनामुळे उत्पादनात २० टक्के वाढ होते. हवामानातील सततच्या बदलामुळे ज्वारी पिकावर मावा व चिक्का रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. सकाळी गारवा व दिवसा वाढलेले तापमान यामुळे या किडींचा प्रसार होतो. यावर - नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी क्लोरपायरिफॉसची फवारणी करावी.

# शेतकऱ्यांचा कामाचा माणुस

मा. शेतकरी न्याय हक्क विचार मंच अध्यक्ष व तिवसा तालुक्यातील लढवय्ये व्यक्तिमत्व, शेतकऱ्यांचा कामा माणुस म्हणुन ओळल्या जाणारे मा. दिनेश पुंडलिकराव वानखडे हे शेदुर्जना खुर्द या छोट्याशा गावातील असुन सुध्दा त्यांनी राजकीय धुरंदर गावात सामाजिक मुद्दे हाताळता असतांनाच त्यांनी भाजपा सोबत एकजुटीने , एकनिष्ठेने राहुन आपल्या कार्यातून सर्व अमरावती जिल्ह्यात परिचित व्यक्तीमत्व यांचा आज वाढदिवसा निमित्ताने त्यांच्या जिवनामध्ये त्याचा कार्याचा उजाळा देण्याचा आज खरा शुभ दिवस ठरतो. राजकीय जिवनात अनेक वर्षांपासून जमिनीवर राहुन शेतकऱ्यांसाठी काम करुन शेतकऱ्यांना कित्येकदा न्याय मिळुन दिला.भारतीय जनता पार्टी मध्ये अनेक वर्षांपासून सातत्याने काम करून भारतीय जनता पक्षाच्या राजकीय, सामाजिक उपक्रमात मध्ये सातत्य

ठेवले.मा..दिनेशभाऊ राजकारणात येण्याचा उद्देश आपल्या शेतकऱ्यांना आपल्या समस्याचे निर्वारण व्हावे.तसेच दिन दलीत.दुबळ घटकांना वंचितांना आपला हक्क मिळावे.स्वच्छ प्रशासन मिळण्यासाठी त्याचा नेहमीच प्रयत्न राहला.त्यासाठी ते राजकारणात आले.शेतकऱ्यांना एक हक्काचे एक व्यासपीठ मिळावे.त्या माध्यमातून एकजुटीने आपल्या समस्या मांडता येतील व निर्वारण होतील.त्यासाठी शेतकरी न्याय हक्क विचार मंच स्थापनकेले.नुसता स्थापन करू थांबले नाहीत तर त्यांच्या समस्या पक्षाला व शासनाला सांगुन त्या अश्या सोडविण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील राहीले.सन २०१२-



१३ मध्ये अनेक शेतकऱ्यांनी पिक विमा काढला परंतू नैसर्गिक आपत्तीने अनेक पिकांचे नुकसान झाले.तरी सुध्दा शासनाने पिक विमा लागू केला नाही.परंतू दिनेश भाऊ नी पुढाकार घेऊन आंदोलन करून कापूस,तुर व इतर पिकांच्या लाभ तालुक्यासाठी नाही तर जिल्ह्यात पिक विमा लागु करण्यात मा.दिनेशभाऊ चा सिंहांचा वाटा होता.तसेच २०२२-२३मध्ये अचानक नाफेड अंतर्गत होणारी चऱ्याची खरेदी सरकारने बंद केली.अनेक शेतकऱ्यांचा माल कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये पडुन राहिला तेव्हा शेतकरी न्याय हक्क विचार मंचयांच्या वतीने तहसील कार्यालय तिवसा तसेच जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे ठिय्या आंदोलन करू चना खरेदी पुर्ववत करुन घेतली.तसेच कामाचा वारसा पुढे ठेवून सन २०२३-२४मध्ये तिवसा तालुक्यात फार मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली .तिवसा तालुक्यातील बरेच गाव त्यात कु-हा व वरखेड मंडळ संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने वगळले .पण एकदा नाही तर दोनदा तहसिलदार व कृषी अधिकारी तिवसा यांना निवेदन देऊन या नंतर निवेदन न देता थेट रस्त्यावर उतरून ठिय्या आंदोलन करतील.परंतू शासनाने त्यांच्या निवेदनाची दखल घेऊन शेतकऱ्यांना त्याचा हक्का वाटा मिळुन देण्यात मा.दिनेशभाऊचा सिंहांचा वाटा होता.तालुक्यातील शेतकरी न्याय हक्क विचार मंचच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजना, पांदन रस्ते.तसेच तहसिल कार्यालय कोणतेही काम भाऊ ना कळल्यावर ते काम योग्य पुणे हातातुन त्या त्या गरजू व्यक्तीना,योग्य न्याय मिळुन दिला.



जसे कार्य सर्व ऑफिसच्या तांब्या भाऊ कळे आहे की काय.ऐवढी कामाबद्दल ची तत्परता त्यांच्या कामात आहे.त्याचा अप्रतिम शासनासोबत असलेल्या संवादाने प्रशासनावर अतिशय पकड असलेला हातखंडा मा.दिनेशभाऊ उपजत आहे.अनेक शेतकरी भाऊंच्या घरी जाणुन सुध्दा समस्या अवगत करुन देतात.मा. दिनेश भाऊ कार्याचा गौरव पाहुन मी सुध्दा भारावून गेला.असा व्यक्तीमत्व, गुणवत्ता,गुणवान, कर्तव्य दक्ष, कर्तुत्ववान, एकनिष्ठ , प्रमाणिक ,मनमिळाऊ पणा असणारे व्यक्ती आपला तिवसा तालुक्याला लाभले हे आपले भाग्य समजतो.मी पण भाऊंचे हे कौशल्य युक्त गुण पाहुन शेतकरी न्याय हक्क विचार मंचा समन्वयक सभासद झालो.एक सदस्य म्हणुन मा.दिनेश भाऊ च्या मला माहीत संपलेल्या कार्याची थोडीफार उजळणी करण्याचा छोटासा प्रयत्न आहे.अश्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्व व्यक्ती म्हणजे माननीय दिनेश भाऊ वानखडे यांचा आज जन्मदिवसाच्या मनःपूर्वक खुप खुप शुभेच्छा.

**नंदकिशोर ना.जिरापुरे**
समन्वयक शेतकरी न्याय हक्क विचार मंच महाराष्ट्र राज्य.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १० जानेवारी २०२६

शहर/ग्रामिण

# उत्तरभारतातून येणाऱ्या थंडवायांचा वेग वाढला

## ४८ तासात अमरावतीसह विदर्भात शीतलहर

### हवामान खात्याचा इशारा किमान तापमान आठ अंश से पर्यंत घसरण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती,**
जानेवारी बदल होत असताना आणखी एक मोली उपलब भारतातून येणाऱ्या थंड वाऱ्याचा वेग वाहवाने तापमानात लक्षणीय घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या ४८ तासांत अमरावतीसह विदर्भातील अनेक जिल्ह्यात शीतलहरीचा प्रभाव जाणवूशकते, असाइशारा भारतीय हवामान खात्याने दिला आहे.



विदर्भात दोन दिवसांपूर्वीच तापमान आठ अंशाखाली गेले होते. गोंदियात सात अंश सेल्सिअस तर नागपुरात ७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद होती. आता पुन्हा एकदा विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये किमान तापमान आठ अंश सेल्सिअसच्या खाली जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे

आवाहन हवामान खात्याने केले आहे.

रात्रीसोबत दिवसाच्या तापमानात घट होणार विदर्भात नागपूर, अमरावती आणि वर्धा

जिल्ह्यांत शीतलहरीचा प्रभाव जाणवणार असून, रात्रीसोबतच दिवसाच्या तापमानातही घट होण्याचा अंदाज आहे. तर मेळघाटमधील धारणी वचिखलदरा या दोन तालुक्यात थंडीबरोबरच पहाटेच्या वेळी दाट धुक्याची शक्यता आहे.

शेती आणि आरोग्यावर परिणाम

अचानक वाढलेल्या थंडीचा परिणाम शेती पिकांवरही होण्याची शक्यता आहे. बागायती पिकांना थंडी आणि धुक्याचा फटका बसू शकतो. अशा

परिस्थितीत बागेत धूर करणे किंवा हलके पाणी देणे उपयुक्त ठरू शकते. थंडीमुळे गहू पिकाला पोषक वातावरण मिळेल; मात्र दाट धुक्यामुळे हरभऱ्यावर रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. आरोग्याच्या दृष्टीने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनविकार असणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी. पहाटेच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, असा साला देण्यात आला आहे.

**१३ जानेवारीपर्यंत थंडीची लाट**

थंडीची लाट १२ ते १३ जानेवारी २०२६ पर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. त्यानंतर अरबी समुद्रातून बाष्पयुक्त वारे येऊ लागल्यास थंडीचा जोर हळूहळू कमी होईल आणि काही भागांत ढगाळ वातावरण निर्माण होऊ शकते. दरम्यान, सध्या तरी उत्तर भारताकडून येणाऱ्या कोरड्या आणि थंड वाऱ्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला कवेत घेतले असून, वापर करावा आणि शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज नागरिकांनी घराबाहेर पडताना उबदार कपड्यांचा लक्षात घेऊनच शेतीकामांचे नियोजन करावे असे आवाहन करण्यात आले.

# नायलॉन मांजावर बंदी असतानाही विक्री

## अंजनगाव सुर्जीत कारवाई, एकास अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अंजनगाव सुर्जी**
पतंग उडविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजामुळे नागरिक, दुचाकीस्वार तसेच पक्षी व प्राण्यांना गंभीर दुखापत होण्याच्या घटना सातत्याने समोर येत असल्याने महाराष्ट्र शासनाने नायलॉन मांजाच्या उत्पादन, साठवणूक व विक्रीवर संपूर्णतः बंदी घातलेली आहे. मात्र या आदेशाचे उल्लंघन करत नायलॉन मांजाची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याचे उघडकीस आल्याने अंजनगाव सुर्जी पोलिसांनी मोठी कारवाई करत एका इसमास रंगेहात अटक केली आहे.



या कारवाईत सुमारे १३ हजार रुपये किमतीचा नायलॉन मांजाचा साठा जप्त करण्यात आला.मा. पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांच्या आदेशानुसार नायलॉन मांजाविरोधात ९ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी हद्दीत डी.बी. पथकाकडून नियमित गस्त घालण्यात येत होती. गस्ती दरम्यान पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे एका ठिकाणी नायलॉन मांजाची बेकायदेशीर विक्री सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.या माहितीच्या आधारे पोलिसांनी तत्काळ कारवाई करत अंजनगाव सुर्जी येथील संबंधित ठिकाणी छापा टाकला. छाप्यात एका इसमाकडून मोठ्या प्रमाणात नायलॉन मांजाचा साठा आढळून आला. चौकशीदरम्यान आरोपीने आपले नाव अब्दुल मजीद मोहम्मद शरीफ, रा. इस्लामनगर, अंजनगाव सुर्जी असे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडून नायलॉन मांजाने भरलेले एकूण ६८ लहान व मोठे रील्स ताब्यात घेतले असून या साठ्याची अंदाजे किंमत १३,००० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.नायलॉन मांज अत्यंत तीक्ष्ण व मजबूत असल्याने पतंगबाजीदरम्यान अनेकदा दुचाकीस्वारांच्या गळ्यावर, हातावर तसेच शरीरावर गंभीर जखमा होतात. तसेच झाडांवर अडकलेल्या नायलॉन मांजामुळे पक्षी जखमी होऊन मृत्युमुखी पडण्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात आहे. या गंभीर परिणामांचा विचार करून शासनाने नायलॉन मांजावर पूर्ण बंदी लागू केली आहे.

तरीदेखील काही विक्रेते आर्थिक फायद्यासाठी नियमांचे उल्लंघन करत असल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत पोलीस निरीक्षक सूरज बोंडे , पोलीस उपनिरीक्षक भारत चिरडे, पोहेकॉ अमित घाडे, आकाश रांगरी, मोईसान खान पठाण, प्रमोद चव्हाण तसेच महिला अंमलदार चित्रा चव्हाण यांनी सक्रिय सहभाग घेतला.या प्रकरणी आरोपीविरुद्ध लागू कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक भारत चीरडे हे करीत आहेत.

# खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील आस्थापनांनी ई-आर-१ सादर करण्यासाठी ऑनलाईन सुविधांचा लाभ घ्यावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती,**
कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांच्याकडून पुरविण्यात येणाऱ्या रोजगारविषयक सर्व सेवा आता ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत. या सुविधांसाठी www.mahaswayam.gov.in हे संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. तसेच उद्योजक व आस्थापना यांनी सेवायोजन कार्यालय (रिक्त पदे अधिसूचित करण्याची सक्ती करणारे) कायदा १९५९ व नियमावली १९६० कलम ५ (१) व कलम ५ (२) अन्वये त्रैमासिक ई-आर-१ ऑनलाईन सादर करणे बंधनकारक आहे.

डिसेंबर-२०२५ अखेर संपणाऱ्या त्रैमासिक ई-आर-१ ऑनलाईन या प्रपत्राची माहिती वरील संकेतस्थळावर सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी उद्योजक, आस्थापना यांनी त्यांचे युजर आयडी व पासवर्डच्या माध्यामातून लॉगिन करून ऑनलाईन सादर करावयाची आहे. ऑनलाईन ई-आर-१ सादर करतांना काही अडचण असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, या कार्यालयाशी संपर्क साधावा. किंवा दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ यावर संपर्क साधावा. ई-आर-१ सादर करण्याची अंतिम मुदत जानेवारी-२०२६ आहे. ई-आर-१ ऑनलाईन सादर न करणाऱ्या आस्थापनांवर विहित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील ८० शाळांमध्ये राबविणार 'शाळा सुरक्षा कार्यक्रम'

## ३०० आपदा मित्र व सखी देणार आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती,** जिल्ह्यातील नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींचा धोका लक्षात घेता, आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून विशेष पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रशिक्षित करण्यात आलेले ३०० आपदा मित्र आणि आपदा सखी आता जिल्ह्यातील पूरप्रवण व धोकादायक भागातील ८० शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे थेट प्रशिक्षण देणार आहेत, अशी माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षम करण्यासाठी ३०० आपदा मित्र व सखींची निवड करून त्यांना १२ दिवसांचे निवासी प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षित स्वयंसेवकांना शाळा सुरक्षा कार्यक्रम प्रभावीपणे राबविता यावा, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात नुकतेच एक दिवसीय उजळणी प्रशिक्षणही देण्यात आले.



या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना पूर, भूकंप, आग आणि वीज पडणे यांसारख्या संकटांच्या वेळी 'काय करावे आणि काय करू नये' याचे मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच प्रथमोपचार, शोध व बचाव साहित्याची ओळख, जखमींना उचलण्याच्या विविध पद्धती आणि आपत्ती काळातील शासनाची भूमिका या विषयावर प्रात्यक्षिकांसह जनजागृती केली जाणार आहे.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जात आहे. मान्सून कालावधीत आणि इतर आपत्तींमध्ये हे आपदा मित्र प्रशासनाला मोलाची मदत करत आहेत. या शालेय प्रशिक्षणामुळे ग्रामीण भागातही या स्वयंसेवकांची ओळख निर्माण होणार असून, आपत्तीच्या वेळी होणारी जीवितहानी टाळण्यासाठी मोठे मनुष्यबळ उपलब्ध झाले आहे. या कार्यक्रमाला जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आणि जिल्हा शोध व बचाव पथक उपस्थित राहणार आहे. विशेष म्हणजे, कोणतेही मानधन न घेता हे आपदा मित्र समुदाय समन्वयक म्हणून सामाजिक बांधिलकीतून कार्य करत आहेत, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी दिली आहे.

# 'सिकलसेल मुक्त'साठी 'अरुणोदय' मोहिम

## आरोग्य विभागाचे जिल्हास्तरीय प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती-**
सिकलसेल आजाराचे प्रमाण कमी करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे 'अरुणोदय' ही विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या पूर्वतयारीसाठी आज येथील आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रात जिल्ह्यातील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष प्रशिक्षण शिबिर पार पडले.

ही मोहीम संपूर्ण जिल्ह्यात १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्रभावीपणे राबविली जाणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाला श्रीमती डॉ. पोटपिटे, डॉ. शिरसाठ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल क्षीरसागर, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी वनिता शिंदे, जिल्हा सिकलसेल समन्वयक गोकुळ ठाकूर उपस्थित होते. उपस्थितांनी मोहिमेचे नियोजन, सिकलसेलचे लवकर निदान, उपचार आणि जनजागृती या विषयावर मार्गदर्शन केले.

ही मोहीम राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये राबवली जात आहे. त्यानुसार जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाची तपासणी करण्याचे उद्दिष्ट आहे. सिकलसेल हा अनुवांशिक आजार असून लाल पेशी विळयाच्या आकाराच्या झाल्यामुळे रक्तपुरवठ्यामध्ये अडथळा येतो, त्यामुळे विवाहपूर्वी 'सोल्युबिलिटी टेस्ट' करणे आवश्यक आहे. लाल आणि पिवळे कार्ड असलेल्या व्यक्तींनी आपापसात विवाह टाळावा, असा सल्ला देण्यात आला आहे.

सिकलसेलग्रस्त रुग्णांना शासनामार्फत विविध सवलती दिल्या जातात. यात संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य, दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेत जादा वेळ, एसटी बस प्रवासात सवलत दिली जाते.

जिल्ह्यातील नागरिकांनी शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन सिकलसेलची मोफत तपासणी करून या मोहिमेला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांनी केले आहे.

# मेळघाट आरोग्य परिक्रमेत डॉक्टरांनी सक्रीय सहभाग नोंदवावा

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती-** मेळघाटातील महिला व बालकांच्या आरोग्यासाठी मेळघाट परिक्रमा हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. महिन्यातील एक दिवस या भागात विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी खासगी डॉक्टरांनी या उपक्रमात सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात वॉर रूम बैठकीत सामाजिक आणि आरोग्यविषयक आढावा घेण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांच्यासह शहरातील वैद्यकीय व्यावसायिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी मेळघाटातील आरोग्यविषयक प्रश्नांची माहिती दिली. याठिकाणी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमुळे माता व बाल मृत्यू नियंत्रणात आहे. मात्र यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी महिला व बालकांच्या आरोग्यासाठी नियमित तपासणी करण्यात येणार आहे. प्रामुख्याने महिला व बालरोग तज्ज्ञ शासनाच्या वतीने उपलब्ध करून देण्यात येतील. यात त्यांच्या आरोग्याची तपासणी होऊन त्यांच्या आजाराचे निदान होऊ शकेल. त्यामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या समस्या कमी होतील. आरोग्याच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांसोबतच महिला आणि बालकांना पौष्टिक अन्न मिळावे, यासाठी डॉ. आशिष सातव यांनी सूचविलेल्या उपायांवर कृषि विज्ञान केंद्राकडून कार्यवाही करण्यात येणार आहे. यासाठी एकात्मिक बाल विकास विभागाचे सहकार्य करण्यात येणार आहे.



यासोबतच ११ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या किडणीची तपासणी करण्यात येणार आहे. प्रामुख्याने किडणीचे आजार आढळणाऱ्या भागावर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. यामुळे भविष्यातील निर्माण होणाऱ्या समस्या कमी होण्यास मदत होईल. रक्तसंसर्गासाठी उपाययोजना करण्यात येणार असून कुपोषण निवारणासाठी ग्राम समितीची महिन्यातून एकदा सभा घेण्यात येणार आहे. मेळघाटातील आरोग्य सुधारावे, यासाठी जीवनसत्वयुक्त आहाराचा समावेश करण्यावर भर देण्यात येणार आहे. आरोग्यासह नागरिकांचे जीवनमान सुधारण्यावर भर देण्यात येणार आहे. यासाठी दुध उत्पादन वाढवून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी सहकार्य करण्यात येणार आहे. यासाठी दोन शितवाहन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मोहफुलांमधून उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणार आहे. मोहफुल वेचण्यासाठी नेट आणि सुकविण्यासाठी ड्रायर देण्यात येणार आहे. तसेच प्रक्रिया करून विविध उत्पादने तयार करण्यात येणार आहे. नागरिकांना संपर्कात व्यत्यय येऊ नये, यासाठी वीज आणि मोबाईल नेटवर्क सुरळीत चालू राहिल, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केल्या

# खेलो इंडिया ट्रायबल गेम्स १३ जानेवारीला अमरावतीत निवड चाचणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती,** केंद्र शासनाच्या निर्देशानुसार छत्तीसगड राज्यामध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या 'पहिली खेलो इंडिया ट्रायबल गेम्स २०२५-२६' साठी महाराष्ट्र राज्यस्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेअंतर्गत फुटबॉल, हॉकी, आर्चरी, थलेटिक्स, जलतरण, वेटलिफ्टिंग व कुस्ती या खेळांचा समावेश असून ही स्पर्धा खुल्या वयोगटात पार पडणार आहे. अमरावती येथील जिल्हा क्रीडा संकुल, तपोवन गेट येथे दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी आर्चरी, कुस्ती व वेटलिफ्टिंग या तीन खेळांच्या निवड चाचण्या घेतल्या जाणार आहेत.



या राज्यस्तरीय निवड चाचणीमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी १२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती येथे उपस्थित राहून आपली नोंदणी करणे अनिवार्य आहे. सहभागी होणाऱ्या खेळाडूंना अनुसूचित जमाती (ढढ) प्रवर्गातील जात प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (डोमेसाईल) आणि मूळ आधार कार्ड ही कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक आहे. या निवड चाचणीतून पात्र ठरणारे खेळाडू राष्ट्रीय स्तरावरील निवड चाचणीसाठी पात्र ठरतील, ज्यातून अंतिम भारतीय ट्रायबल गेम्ससाठी संघाची निवड केली जाईल.

वैयक्तिक खेळ प्रकारात आर्चरीसाठी प्रथम ३, तर कुस्ती व वेटलिफ्टिंगसाठी प्रथम २ खेळाडूंची निवड राष्ट्रीय चाचणीसाठी केली जाणार आहे. खेळाडूंनी स्वतःच्या खर्चाने व जोखमीवर या चाचणीत सहभागी व्हायचे असून, प्रशासनामार्फत केवळ निवास व भोजनाची व्यवस्था केली जाईल. तरी अमरावती विभागासह राज्यातील जास्तीत-जास्त अनुसूचित जमातीच्या खेळाडूंनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अनिल इंगळे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी खेळाडूंनी स्वप्नील चांदेकर (९४०४३७९६७७), श्रीमती त्रिवेणी चौधरी (९९७५५९०२३२) किंवा शेख सलीम (९६५७२७७४५७) यांच्याशी संपर्क साधावा.




# मलबार गोल्डतर्फे ‘ब्राइड्स ऑफ इंडिया’ अभियानाचे १५ वे पर्व सादर

## भारतीय विवाह परंपरेचा भव्य गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

जागतिक पातळीवरील अग्रगण्य दागिन्यांच्या विक्रेत्यांपैकी एक असलेल्या मलबार गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड्स यांनी आपल्या प्रतिष्ठित आणि बहुप्रतिक्षित ‘ब्राइड्स ऑफ इंडिया’ अभियानाचे १५ वे पर्व नुकतेच सादर केले. भारतीय विवाहसंस्कृतीतील वैविध्य, परंपरा आणि भावनिक नाते यांचा सुंदर संगम या अभियानातून अधोरेखित करण्यात आला आहे. भारतातील विविध प्रांतांतील विवाह परंपरांचा गौरव करणारे हे अभियान दरवर्षी नव्या संकल्पनेतून सादर केले जाते.यंदाच्या विशेष आवृत्तीत देशभरातील २२ नववधूंसह १० नामवंत कलाकारांचा सहभाग आहे. यामध्ये आलिया भट्ट, करीना कपूर, अनिल कपूर, मानसी परांजपे यांच्यासह इतर




लोकप्रिय कलाकारांचा समावेश आहे. या सर्व कलाकारांनी भारतातील विविध सांस्कृतिक पार्श्वभूमींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नववधूंच्या भूमिकेतून या अभियानाला भव्यतेची आणि भावनिक खोलीची जोड दिली आहे.अमरावती शहरातील राजकमल चौक स्थित मलबार या शो - रूम ला देखील अनेक ग्राहक व नववधू भेट देत असून खरेदी करत आहे.‘ब्राइड्स ऑफ इंडिया’ अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक नववधूची परंपरा, सांस्कृतिक वारसा आणि वैयक्तिक ओळख जपणारे दागिने सादर करणे. या माध्यमातून भारतातील उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम तसेच ईशान्येकडील विवाहसोहळ्यांची भव्यता, विधी, परंपरा आणि कुटुंबीयांतील भावनिक नाते अतिशय सुंदर पद्धतीने मांडण्यात आले आहे.या वर्षीच्या अभियानात तीन प्रमुख दागिन्यांच्या कलेक्शन सादर करण्यात आल्या आहेत.‘डिव्हाईन कलेक्शन’ हे भारतीय वारसा आणि मंदिरकलेपासून प्रेरित असून

अमरावती शहरात जेंव्हा आमचे शो रुम झाले तेंव्हा पासून अमरावतीकरांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले.मलबार गोल्डतर्फे ‘ब्राइड्स ऑफ इंडिया’ अभियानाचा लाभ अवश्य घ्यावा.
– **आशिष जोशी** व्यवस्थापक (मलबार)



पारंपरिक सौंदर्य आणि शाश्वत डिझाइन अधोरेखित करते.‘ प्रेशिया कलेक्शन’ मध्ये रुबी, एमरल्ड आणि सॅफायरसारख्या मौल्यवान रत्नांनी सजलेले आकर्षक आणि राजेशाही दागिने सादर करण्यात आले आहेत.तर ‘डायमंड कलेक्शन’ मध्ये आधुनिक डिझाइनसोबत पारंपरिक शैलीचा सुरेख संगम पाहायला मिळतो, जो आजच्या नववधूंच्या बदलत्या आवडीचे प्रतीक आहे.मलबार गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड्सतर्फे सांगण्यात आले की, हे अभियान भारतभरातील सर्व नववधूंना समर्पित असून, परंपरा आणि वैयक्तिक अभिव्यक्ती यांचा सुंदर मेळ यातून साकार करण्यात आला आहे. भारतीय विवाह म्हणजे केवळ एक विधी नसून, तो संस्कृती, भावना आणि नात्यांचा उत्सव आहे, ही भावना या अभियानातून मांडण्यात आली आहे.सध्या मलबार गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड्सचे १४ देशांमध्ये ४१० हून अधिक शोरूम्स कार्यरत असून, भारतातील अग्रगण्य आणि विश्वासार्ह ब्राइडल दागिन्यांचे केंद्र म्हणून कंपनीची ओळख आहे. ‘ब्राइड्स ऑफ इंडिया’ अभियानाच्या १५ व्या पर्वाने पुन्हा एकदा भारतीय विवाहसंस्कृतीचा जागतिक स्तरावर गौरव केला आहे.

# मुंबईला जन्माला येऊन म्हातारे देखील झाले, विकास काय केला ते सांगा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० नागपूर :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईबाहेरील व्यक्ती असल्याचे म्हणत केलेल्या टीकेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपुरातून प्रत्युत्तर दिले आहे. मुंबईला जन्माला येऊन आता लोक म्हातारे होऊ लागले आहेत. मात्र, ते विकास करू शकले नाहीत. मुंबईच्या विकासाची खरी सुरुवात तर केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी ५५ उड्डाणपूल बांधून केली होती आणि मी एकनाथ शिंदेंसोबत मिळून ३६० डिग्रीने विकास केला, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी केले. नागपुरात आयोजित 'तरी पोहा विथ देवाभाऊ' या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

अभिनेते भारत गणेशपुरे व अभिनेत्री-कवयित्री स्पृहा जोशी यांनी ही मुलाखत घेतली. मागील काही काळापासून राजकारणातील लोकांमध्ये



### मागच्या जन्मी पाप करणारा होतो नगरसेवक-महापौर

यावेळी फडणवीस यांनी त्यांच्या शैलीत कोट्यादेखील केल्या. मी पहिल्यांदा नगरसेवक झालो तेव्हा दुसऱ्याच दिवशी हे काम किती कठीण आहे हे लक्षात आले. मागच्या जन्मात पाप करणारा नगरसेवक होतो व महापाप करणारा महापौर होतो असे मी गमतीने म्हणतो. या दोन्ही पदांवर मोठी जबाबदारी असते व ती पार पाडण्यासाठी तसा संयम आवश्यक आहे, असे फडणवीस म्हणाले.

वेगळी भावना दिसून येते आहे. आम्ही आमच्या भागाचे, मतदारसंघाचे राजे किंवा मालक असल्यासारखे ते वागतात. तेथील विकासकामे, इमारती आम्हाला विचारून झाले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. लोकप्रतिनिधींमधील ही भावना संपली पाहिजे व सेवाभाव वाढायला हवा, असे मुख्यमंत्री म्हणाले. राजकारणात यशस्वी व्हायचे असेल तर संयमासोबतच शिव्या खाण्याची तयारीदेखील ठेवली पाहिजे असेदेखील ते म्हणाले.

**टीका-टोमणे नव्हे विकासावर जनतेचा विश्वास**

उद्धव ठाकरेंच्या बॉम्बेबाबतच्या आरोपांना मी गंभीरतेने घेत नाही. २५ वर्षे काम केले नाही व दाखवायला काहीच नाही. अफवांचा बाजार उठवून मते मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र, त्यांच्या अफवांवर कुणीच विश्वास ठेवत नाही. पराभव डोळ्यासमोर दिसत असल्याने हे राजकारण सुरू आहे. जनता टीका व टोमणे नव्हे तर विकासावर मतदान करेल. किमान २७ महानगरपालिकांमध्ये महायुतीची सत्ता असेल असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

**नवीन नागपूर ठरेल रोजगाराचे 'मॅग्नेट'**

नागपूर महाराष्ट्रात राजधानीचा दर्जा सोडून सहभागी झाले होते. मात्र, तरीदेखील येथे विकासाचा अनुशेष वाढतच गेला. आम्ही नागपूरसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्याच्या विकासावर लक्ष केंद्रित केले. आता नागपूरचा वेगाने विकास होत आहे. नवीन नागपुरात तर अत्याधुनिक पायाभूत सुविधा असतील व तेथे पाच लाख रोजगारांची निर्मिती होईल. नागपूरच्या रोजगारासाठी नवीन नागपूर हे 'मॅग्नेट' ठरेल असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला.

## जिल्हा परिषद शाळा शेंदूरजना बाजार येथे मिशन IAS सामान्य ज्ञान स्पर्धा -२०२६ चे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९शेंदूरजना बाजार-**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शैक्षणिक उपक्रम २०२५-२६ अंतर्गत मिशन ख-ड-सामान्य ज्ञान स्पर्धा -२०२६ चे जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा शेंदूरजना बाजार येथे दि. ९ जानेवारी २०२६ रोजी आयोजन करण्यात आले.ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बालवयापासून स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.सदर परीक्षेला इयत्ता ५ वी ते ७ वी मधील एकूण ५६ विदयार्थी सहभागी झाले. सदर परीक्षा करीता केंद्र संचालक म्हणून सौ. वंदना विंचुरकर मॅडम होत्या. पर्यवेक्षक म्हणून सदर शाळेतील सहाय्यक शिक्षक दिनेश भलावी, सुजाता ब्राह्मणे आणि गुलाबराव मुंदाने होते. केंद्र निरीक्षक म्हणून श्री. आकाशभाऊ आसोडे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांनी कार्यभार सांभाळला. या उपक्रमाला यावर्षी २० वर्ष पूर्ण झाले. सदर उपक्रमाचे आयोजन श्री. कृष्णा चिचमलकर (विज्ञान विषय शिक्षक) जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा शेंदूरजना बाजार यांनी केले.ते २० वर्षापासून जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांकरीता हा उपक्रम राबवित आहे. हा अत्यंत स्तुत्य व स्पर्धेच्या काळात उपयुक्त असा उपक्रम आहे. हा उपक्रम सदर शाळेत १६ ऑगस्ट २०२५ ते ८ जानेवारी २०२६ या कालावधीत राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांना परिसर ज्ञान (गाव ते जग )याविषयी संपूर्ण माहिती तसेच नवोदय व स्कॉलरशिप परीक्षा,सामान्य ज्ञान,चालू घडामोडी यावर आधारित संपूर्ण मार्गदर्शन व सराव देण्यात आला. सदर उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक जयप्रकाश नेमाडे, विषय शिक्षक राजेंद्र ठाकरे, सहाय्यक शिक्षक दिनेश भलावी, गुलाबराव मुंदाने, वंदना विंचुरकर, सुजाता ब्राह्मणे तसेच कु. मोहिनी चौधरी यांनी सहकार्य केले. सदर स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी संपन्न होणार आहे.

## भारत २०४७ च्या दिशेने ग्रामीण रोजगाराचा नवा संकल्प म्हणजे 'जीरामजी' विधेयक

### खासदार डॉ. अनिल बोंडे यांचे प्रतिपादन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

विकसित भारत २०४७’ या राष्ट्रीय रष्टीकोनाच्या अनुरूप ग्रामीण विकासाचा नवा आराखडा उभारण्यासाठी श्इ-ऋफाट ऋविधेयक सादर करण्यात आले आहे. हे विधेयक म्हणजे विकसित भारत २०४७ च्या दिशेने ग्रामीण रोजगाराचा नवा संकल्प असल्याचे प्रतिपादन या अभियानाचे महाराष्ट्राचे आयोजक खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले.

या संदभांत आयोजित पत्रकार परिषदेला आमदार राजेश वानखडे, आमदार प्रताप अडसड, आमदार केवलराम काळे, आमदार राजेश बकाने, जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, रविराज देशमुख, धरणाचे नगरध्यक्ष सुनील चौथमल यांची पत्रकार उपस्थिती होती. या अभियानाबद्दल माहिती देताना डॉ. अनिल बोंडे म्हणाले, प्रत्येक गरीब नागरिकाला रोजगार मिळावा, त्याच्याश्रमाची गरिमा जपली जावी आणि समाजातील गरीब, आदिवासी व मागास कायद्याचा मूळ उद्देश आहे. हे विधेयक घटक मुख्य प्रवाहात यावेत, हा या महात्मा गांधीजीच्या विचारधारेशी सुसंगत असून प्रेरणा रामराज्याच्या घेऊन संकल्पनेतून सर्वसमावेशक विकासासाठी आणण्यात आले आहे, असे अनिल बोंडे यावेळी म्हणाले. प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला दरवर्षी १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली आहे.

वनक्षेत्रात काम करणारथा अनुसूचित जमाती कामगारांना अतिरिक्त २५ दिवसांचा रोजगार दिला जाईल. नव्या योजनेत कामाचे दिवस वाढवण्यात आले असून दर आठवड्याला मंजुरी देण्याची तरतूद करण्यात आली आहे.मजुरी दिली जाल होली, मनरेगा योजनेअंतर्गत आतापर्यंत एकूण ११.७४ लाख कोटी रुपये खर्च झाले असून त्यापैको ८.५३ लाखा कोटी रुपये खर्च मोदी सरकारने केले आहेत, हे ग्रामीण विकासाबाबत सरकारची कटिबद्धता दर्शवले रोजगार योजना सुरुवातीपासून महात्मा गांधीच्या नावाने नव्हती. १९८० मध्ये 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम' सुरू केला, नंतर राजीव गांधींनी त्याचे नाव 'जवाहर रोजगार योजना' केले. २००४ मध्ये सोनिया-मनमोहन सरकारने तो योजना ठफ्एत्रा केलो आणि २००५ मध्ये टठफरत्रा करण्यात आली. काँग्रेस सरकारने जवाहर रोजगार योजनेचे नाव बदलले, तेव्हा तो पंडित जवाहरलाल नेहरूंचा अपमान नव्हता का? ग्रामीण आवास योजनेचे नाव १९८५ मध्ये राजीव गांधीनी बदलून इंदिरा आवास योजना’ केले.-

## आज अमरावतीत खा. ओवेसींच्या दोन सभा

### आ. अकबरुद्दीन ओवेसी १२ जाने. ला अमरावतीत



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती-** नगरपालिका निवडणुकांचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्ष त्यांच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी आणि नागरिकांना आकर्षित करण्यासाठी विविध फंडे उपयोगात आणत आहे. शुक्रवारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा झाली. आता शनिवार १० जानेवाराला एमआयएमचे नेते ओवेसींच्या दोन सभा शहरात आयोजित केल्या आहे. एक सभा बडनेरला दुपारी त र दुसरी सभा सायंकाळी अमरावतीत होणार आहे.२०१७ च्या निवडणुकीत १० जागा जिंकून इतिहास रचणाऱ्या एआयएमएमनेयावेळीही नगरसेवकांची संख्या १० पेक्षा जास्त राखण्याचा निर्धार केला आहे. यासाठी पक्षप्रमुख आणि खासदार असदउद्दीन ओवेसी यांनी अलीकडेच अमरावतीत सभा झाली. त्यानंतर दोन सभा होत आहे. तसेच त्यांचे लहान भाऊ आ. अकबरुद्दीन ओवेसींची १२ जानेवारी रोजी अमरावतीत सभा होणार आहे.

# समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांची दादागिरी, गुंडगिरी खपवून घेणार नाही

## अमरावतीमधील सभेत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवारांनी टोचले कान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती** काही लोक राजकीय पोळी भाजण्यासाठी समाजात तेढ निर्माण करतात. त्याचा सर्वाधिक फटका गरिबांना बसतो. एखादी अप्रिय घटना घडली की, व्यापाऱ्यांची दुकाने अडचणीत येतात. उद्योग क्षेत्रात त्या शहराबद्दल चुकीचा संदेश पोहचतो. त्यामुळे कुणी भडकवण्यासाठी आले, तर भडकू नका, डोकी शांत ठेवा. राज्यात जातीय सलोखा कायम राहिला पाहिजे. समाजात तेढ निर्माण करणाऱ्यांची दादागिरी, गुंडगिरी खपवून घेणार नाही, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित मेळाव्यात बोलताना दिला.

यावेळी व्यासपीठावर आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, सुरेश चव्हाण, माजी आमदार देवेंद्र भुयार आदी उपस्थित होते. अजित पवार म्हणाले, जर एखाद्या शहरात जातीय तेढ निर्माण होऊन चुकीच्या घटना घडल्या की त्याचे परिणाम




हे सर्वांना भोगावे लागतात. उद्योजक गुंतवणूक करण्यास तयार होत नाहीत. निवडणुका येतील, जातील. पण, जातीय सलोखा कायम राहिला पाहिजे. ते बिघडवण्याचा प्रयत्न कुणी केला, तर त्यांना थारा देऊ नका. ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी असतात, हे आपल्याला माहिती आहे. समाजात फूट पाडण्याचे काम मी खपवून घेणार नाही.अजित पवार म्हणाले, अमरावती शहर हे विभागीय मुख्यालय म्हणून विकसित करायचे आहे. येथे उद्योग यावेत, येथील युवकांच्या हाताला काम मिळावे, यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. टाटा संस्थेच्या सहकार्याने २०० कोटी रुपये खर्चून ‘सीआयआयआयटी’ हे केंद्र उभारले जात आहे. शहरातील रेल्वे उड्डाणपुलाचा प्रश्न सोडवला जाईल. विमानतळाच्या रनवेच्या विस्तारीकरणाची गरज आहे. २५०० कोटींच्या निधीतून भुयारी गटार योजना मार्गी लावली जाईल. तुम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला जबाबदारी द्या, आम्ही तुमच्या विश्वासासाठी पात्र ठरू.

### रोज खा मटण अन् कमळाचे दाबा बटण, चव्हाणांच्या वक्तव्यावरून ठाकूर यांची टीका

आम्ही ज्या पद्धतीने पिंपरी चिंचवड शहरात विकास घडवून आणला. नियोजनबद्ध विकासाच्या माध्यमातून अमरावतीत देखील कायापालट घडून येईल. अजित पवार म्हणाले, मी या ठिकाणी लोकांच्या भावना भडकविण्यासाठी आलेलो नाही. इतरांच्या राजकारणाकडे लक्ष देऊ नका. आमच्यासाठी विकासाचे व्हीजन महत्वाचे आहे. मला अमरावतीत उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारायच्या आहेत. येत्या २३ फेब्रुवारीला विधिमंडळाच्या अधिवेशनापुर्वी अमरावती शहराच्या विकासाच्या योजनांचे प्रस्ताव माझ्याकडे द्या, अर्थसंकल्पातून त्या मंजूर करून आणण्याची जबाबदारी माझी. अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेसला जनतेने बळ दिले, तर निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही अजित पवार यांनी दिली.




# हिजाबवरून ओवैसींवर अनिल बोंडेंची टीका; अर्धसत्य बोलून दिशाभूल

## अमरावतीत राजकीय वातावरण तापले





**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

हिजाब प्रकरणावरून भाजप खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी एआयएमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवैसी यांच्यावर जोरदार टीका केली असून यामुळे अमरावतीच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. ओवैसी हे हिजाबच्या मुद्द्यावरून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप बोंडे यांनी केला.डॉ. बोंडे म्हणाले की, इराणसारख्या देशात मुस्लिम महिलाच एकत्र येऊन हिजाबविरोधात आवाज उठवत आहेत. मुस्लिम महिलांनाही हिजाब नको आहे. कोणालाही पारतंत्र्य नको, प्रत्येकाला स्वातंत्र्य हवे आहे, असे ते म्हणाले. मात्र, ओवैसी भारतातील परिस्थितीबाबत अर्धसत्य मांडत असल्याचा आरोप त्यांनी केला.भारतामध्ये लोकसंख्येचे प्रमाण असंतुलित होत आहे, हा गंभीर विषय आहे. मात्र, ओवैसी या मुद्द्यावर स्पष्ट भूमिका घेत नाहीत, असे सांगत बोंडे यांनी हिंदूंनी एकजूट होण्याचे आवाहन केले. हिंदूंनी एकत्र राहिले तरच हिंदू या देशावर प्रभावीपणे राज्य करू शकतील, असे वक्तव्य त्यांनी केले.या विधानांनंतर राजकीय प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता असून हिजाब, लोकसंख्या आणि धार्मिक मुद्द्यांवरून पुन्हा एकदा राजकीय वाद पेटण्याची चिन्हे दिसत आहेत.

# प्रचाराच्या रणधुमाळीत उमेदवारांची 'हाऊसफुल्ल' दिनचर्या सुरू

## फटाक्यांच्या आतषबाजीतून मतदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**


अमरावती महापालिका निवडणुकीचे रणमैदान दिवसेंदिवस तापत चालले असून, प्रभागनिहाय प्रचाराला प्रचंड वेग आला आहे. कमी कालावधीत जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांनी अक्षरशः स्वतःला झोकून दिले आहे. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या प्रचारामुळे उमेदवारांची दिनचर्या 'हाऊसफुल्ल' झाली आहे.सकाळी लवकर पदयात्रेने प्रचाराला सुरुवात होत असून, घरोघरी भेटी देत थेट मतदारांशी संवाद साधला जात आहे. दुपारच्या सत्रात विविध बैठका, कार्यकर्त्यांच्या आढावा सभा घेतल्या जात आहेत. संध्याकाळनंतर पुन्हा पदयात्रा



आणि रात्री उशिरापर्यंत मुख्य चौकांमध्ये कोपरासभांचा धडाका सुरू असतो. काही प्रभागांत मोठ्या नेत्यांच्या सभांच्याही तारखा निश्चित झाल्या असून, त्या दृष्टीने तयारीला वेग आला आहे.प्रचारासाठी उपलब्ध असलेला कालावधी मर्यादित असल्याने उमेदवारांनी अत्यंत नियोजनबद्ध प्रचार यंत्रणा उभारली आहे. अनेक उमेदवारांनी अधिकृत उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच प्रचाराला सुरुवात केली होती. त्याचा फायदा घेत त्यांनी आपापले प्रभाग अक्षरशः पिंजून काढले आहेत. सकाळी नऊ–दहा वाजता सुरू झालेला प्रचार अनेकदा मध्यरात्रीपर्यंत सुरू राहत आहे.प्रचारादरम्यान फटाक्यांची आतषबाजी हा एक महत्त्वाचा आकर्षणाचा भाग ठरत आहे. उमेदवाराच्या आगमनावेळी मोठ्या प्रमाणावर फटाके फोडून जल्लोष केला जात असून, त्यामुळे वातावरण उत्साही आणि भारावलेले दिसून येते. कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविणे आणि मतदारांवर दृश्यात्मक प्रभाव टाकणे, या उद्देशाने हा प्रकार प्रभावी ठरत असल्याचे दिसते. अनेक ठिकाणी प्रचार रॅली म्हणजे जणू उत्सवाचेच स्वरूप धारण करताना दिसत आहे.घरोघरी जाऊन ज्येष्ठांचा आशीर्वादमहिला उमेदवारांनी प्रचारात वेगळीच पद्धत अवलंबली आहे. त्या स्वतःच्या निवडणूक चिन्हाचे पत्रक आणि तिळगूळ घेऊन महिलांशी संवाद साधत आहेत. आमच्याकडे लक्ष असू द्या, असे म्हणत त्या आपल्या चिन्हाची ओळख करून देत आहेत. मकर संक्रांतीच्या निमित्ताने अनेक उमेदवार मतदारांच्या घरी जाऊन ज्येष्ठांचा आशीर्वाद घेण्यावर विशेष भर देत आहेत.महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमुळे अमरावती शहरातील वातावरण पूर्णपणे राजकीय रंगात न्हाऊन निघाले आहे. तिळगूळ आणि भेटीगाठींचा हा प्रचार मतदारांच्या मनावर किती प्रभाव टाकतो आणि त्याचा प्रत्यक्ष मतदानावर कोणाला फायदा होतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अमरावतीत अजित पवारांच्या वक्तव्यानंतर यशोमती ठाकूर यांचा घणाघात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अमरावती दौऱ्यातील वक्तव्यानंतर काँग्रेस नेत्या आणि माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी तीव्र पलटवार केला आहे. काल अमरावतीत बोलताना अजित पवार यांनी, इथे कोणी दादागिरी, गुंडगिरी किंवा दहशत माजवत असेल तर ती मोडून काढली जाईल, असा इशारा दिला होता. त्यांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना यशोमती ठाकूर यांनी अजित पवारांवर थेट हल्लाबोल केला.यशोमती ठाकूर म्हणाल्या की, खऱ्या अर्थाने अमरावतीतील गुंडगिरी थांबवायची असेल, तर अजितदादांनी आधी सत्तेतून बाहेर पडले पाहिजे. सत्तेत राहून सत्तेचा पुरेपूर वापर करायचा आणि बाहेर मात्र भाजपच्या विरोधात असल्याचं भासवायचं, ही दुटप्पी भूमिका आहे. त्यांनी आरोप केला की, गुंडगर्दी करणारे लोक स्वतः अजित पवारांच्या पक्षातच आहेत.अजितदादांनी जनतेची दिशाभूल करू नये. सत्तेत असताना काय केलं, हे आधी सांगावं. अमरावतीत सेक्युलर मतांसाठी आमिष दाखवून मतदारांची फसवणूक केली जात आहे, अशी टीकाही त्यांनी केली. अजित पवारांनी केलेली विधाने म्हणजे निव्वळ राजकीय स्टंट असून, प्रत्यक्षात कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी सत्ताधाऱ्यांचीच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या टीकेमुळे अमरावतीतील राजकीय वातावरण अधिक तापले असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आरोप-प्रत्यारोपांची धार आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# महापालिका निवडणुकीत संवादातून मतदारांना साद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

महापालिकेत वर्चस्व राखण्याची धडपड सुरू आहे. या निवडणुकीमध्ये समाजमाध्यमांवरील अत्याधुनिक प्रचारासह भेटीगाठीवर भर देण्यात आला. उमेदवारांसह नेते देखील 'जमिनी'वर आले असून गल्ली-बोळांमधून प्रचार भोंगा वाजत आहे. अधिकाधिक मतदारांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचण्याचे सर्वपक्षीय उमेदवारांचे प्रयत्न आहेत. भाजपसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची असून इतर पक्षांसाठी अस्तित्वाचा प्रश्न राहील.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मोठ्या सभा झाल्यानंतर आता उमेदवारांनी आपआपल्या प्रभागांमध्ये मोर्चा वळवला. प्रत्येक प्रभागांमध्ये २१ ते २८ हजार मतदारांची संख्या. प्रचाराच्या अल्प कालावधीत प्रत्येक मतदारांमध्ये पोहोचणे उमेदवारांसाठी अवघड लक्ष्य आहे. घरोघरी भेटीगाठी, संवाद सभा, प्रचार फेऱ्यांच्या माध्यमातून मतदारांना साद घातली जात आहे. पालकमंत्री, खासदार, आमदार उमेदवारांसाठी कॉर्नर सभा घेण्यावर भर देत आहेत. प्रमुख नेत्यांसह उमेदवारांच्या पायाला भिंगरी लागली असून आगामी चार दिवसांमध्ये प्रचार शिगेला पोहोचणार आहे.

# अं.सुर्जी नगरपालिका उपनगराध्यक्ष कोण?

## विशेष सभेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष; नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारताच उपनगराध्यक्षपदासाठी फिल्डिंग

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अंजनगाव सुर्जी**




अंजनगाव सुर्जी नगरपालिकेच्या विजयी उमेदवारांचे सत्कार, स्वागत सुरुच असून, येथिल नवनिर्वाचित नगराध्यक्षांनी पदभारदेखील स्वीकारत कामकाजास प्रारंभ केला आहे. आता उपनगराध्यक्ष कोण होणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. उपनगराध्यक्षपदाच्या निवडीसाठी नगराध्यक्षच पहिली विशेष सर्वसाधारण सभा १६ तारखेला जानेवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे.त्यामुळे या कार्यक्रमाकडे शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन दहा बारा दिवसांचा अवधी उलटला आहे. थेट जनतेतून निवडून आलेल्या नगराध्यक्षांचे शहरभरात ठिकठिकाणी जोरदार स्वागत झाले.अंजनगाव सुर्जी नगरपालिकेवर कोणत्याही एका पक्षाचे बहूमत नसल्याने कोणाची उपनगराध्यक्ष पदाची वर्णी लागणार याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे. शिवसेना ठाकरे गटाचे ७ नगरसेवक निवडून आले आहेत तर काँग्रेस पक्षाचे ९ नगरसेवक निवडून आले आहे. भाजप चे ६ शिंदे गटाचे ३ तर समाजवादी पक्षाचे २ तर एक अपक्ष असे एकूण २८ नगरसेवक निवडून आले असून कोणत्याही पक्षाने बहूमताचा आकडा पार न केल्यामुळे येथिल सर्वच पक्षांतील नवनिर्वाचित नगरसेवकांत मात्र धाकधूक वाढली आहे. उपनगराध्यक्ष या महत्त्वपूर्ण पदावर आपली वर्णी लागावी यासाठी धनाढ्य व ज्येष्ठ नगरसेवकांची फिल्डींग सुरु झाली आहे. उपनगराध्यक्ष पदाच्या निवडीसाठी विशेष सभा बोलविण्याचा अधिकार नगराध्यक्षांना आहे. उपनगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत समान मते मिळाल्यास निर्णायक मत देण्याचा अधिकार नगराध्यक्षांना आहे. त्यामुळे येथे वेळेवर काय राजकीय परिस्थिती निर्माण होणार यावर अवलंबून राहणार आहे.

# बिझीलँड मधील ओपन स्पेसवर अवैधरित्या बांधली तीन मजली इमारत ?ग्रा.पं. सदस्य छत्रपती पटके यांची तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०नांदगाव पेठ**

नांदगाव पेठ ग्रामपंचायत हद्दीतील बिझीलँड येथे बिझिलँड कन्स्ट्रक्शन कंपनीने राखीव ठेवलेल्या ओपन स्पेसवर थेट तीन मजली व्यावसायिक प्रतिष्ठान बांधल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या उभारण्यात आलेल्या इमारतीला कोणतीही कायदेशीर परवानगी नसल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्य छत्रपती पटके यांनी करत औपचारिक तक्रार ग्रामपंचायतीकडे दाखल केली आहे.ओपन स्पेस ही नागरिकांसाठी सार्वजनिक उपयोगाची जागा असल्याने त्यावर व्यावसायिक बांधकाम करणे कायद्याने गुन्हा ठरतो. मात्र बिझीलँड परिसरात नियमांची पायमल्ली करून थेट व्यावसायिक इमारत उभी करण्यात आल्याने छत्रपती पटके यांनी ग्रामपंचायत प्रशासन आणि बिझीलँड कन्स्ट्रक्शन कंपनीवर संगनमत असल्याचा आरोप केला आहे. छत्रपती पटके यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार,नांदगाव पेठ भाग २ सर्व्हे नं.४४०/४,४४१/१अ,४४१/१ब,४४१/१,४४१/२ ही जागा ग्रामपंचायत मध्ये ओपन



स्पेस म्हणून नमूद असून या जागेवर अवैधरित्या तीन मजली टोलेजंग इमारत विनापरवानगी बांधण्यात आलेली आहे. संबंधित बांधकामाला ना ग्रामपंचायतीची परवानगी आहे, ना कोणताही अधिकृत नकाशा मान्य झालेला आहे. ओपन स्पेससारख्या जागेवरच व्यावसायिक इमारत उभी राहणे आणि तेही ग्रामपंचायतीच्या अनभिज्ञतेत हा प्रकार स्थानिक प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करत आहे. ओपन स्पेस हडपून बिल्डर-प्रशासन यांचे संगनमत आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.आता ग्रामपंचायत या तक्रारीवर कोणती कारवाई करते आणि अवैध बांधकामावर घाव घालते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.ह्या प्रकरणाने नांदगाव पेठमध्ये प्रचंड खळबळ उडाली असून, संबंधित बांधकाम किती कायदेशीर, किती बेकायदेशीर आणि मागे कोणाचा हात आहे, हे तपासण्यासाठी ग्रामपंचायतीसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. तीन मजली जे व्यावसायिक प्रतिष्ठान ओपन स्पेस वर उभे आहे त्यासंबंधी नगररचना विभागाने कायदेशीर बांधकाम परवानगी देण्यात आल्याची माहिती आहे मात्र ग्रामपंचायत कडून कोणत्याही प्रकारची बांधकाम परवानगी नसल्यामुळे हा पेच निर्माण झाला आहे. दुसरीकडे बिझिलँड कन्स्ट्रक्शन कंपनीने सुरुवातीचे असलेले ले आउट व नंतर त्यामध्ये अतिरिक्त वाढविलेले ले आउट नगररचना विभागाकडून मंजूर करून घेतले असून वाढीव ले आउट नंतर सर्व ओपन स्पेस एका ठिकाणी देण्यात आल्याचे बिझिलँड कन्स्ट्रक्शन कंपनीचे म्हणणे आहे तर सुरुवातीला ग्रामपंचायत मध्ये सादर केलेल्या नकाशा मध्ये जे ओपन स्पेस दाखविण्यात आले त्याच ओपन स्पेस ची ग्रामपंचायतने नोंद केली असून त्यावर झालेले बांधकाम नियमबाह्य ठरते असा आरोप ग्रा.पं.सदस्य छत्रपती पटके यांनी केला आहे.

नगर रचना विभागाकडून संबंधित दुकानदारास बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र ग्रामपंचायतीने सदर बांधकामाचा तसेच ले आऊट चा नकाशा मागितला असता, आमच्याकडे कोणताही नकाशा उपलब्ध नाही, असे लेखी पत्र नगररचना विभागाने दिले.बिझिलँड कन्स्ट्रक्शन कंपनीने लेआउट वाढीसाठी नगररचना विभागाकडून नकाशा मंजूर करून घेतल्याचे निदर्शनास आले असून, मात्र या संदर्भात ग्रामपंचायतची कोणत्याही प्रकारची पूर्वपरवानगी घेतलेली नाही.

**कु. हर्षदा बोंडे**
**ग्रामपंचायत अधिकारी,नांदगाव पेठ**

### निराधार व दिशाभूल करणारे आरोप

सदर प्रकरणातील आरोप पूर्णतः निराधार व दिशाभूल करणारे आहेत. संबंधित ग्रामपंचायत सदस्यांना ले-आऊटच्या मूलभूत बाबींची माहिती नसल्याचे यातून स्पष्ट होते.ज्या जागेस 'ओपन स्पेस' ठरवण्याचा प्रयत्न केला जात आहे, ती जागा प्रत्यक्षात प्लॉटच्या अंतर्गत खासगी क्षेत्रात मोडणारी असून तिचा ओपन स्पेसशी कोणताही संबंध नाही.संबंधित ले-आऊटमध्ये ओपन स्पेस स्वतंत्रपणे, नियमांनुसार व कागदोपत्री आरक्षित आहे.तथ्यांची शहानिशा न करता केलेले आरोप हे जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करणारे आहे.

**जयराज बजाज**
**संचालक,बिझीलँड कन्स्ट्रक्शन कंपनी**

# साश्रू नयनांनी शहीद जवानाला निरोप; 'वीर जवान अमर रहे'च्या सैन्य व पोलीस दलाकडून मानवंदना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अकोला**

देशसेवेत कर्तव्य बजावत असताना जिल्ह्यातील सैनिक नायक वैभव श्रीकृष्ण लहाने शहीद झाले. त्यांच्या मूळ गावी कपिलेश्वर येथे सैनिकी व शासकीय इतमामात त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सायंकाळी अंत्यसंस्कार केले. 'वीर जवान अमर रहे'च्या घोषणेत वीर जवानाला हजारो नागरिकांनी साश्रू नयनांनी निरोप दिला.

जिल्ह्यातील वैभव लहाने हे सैन्यदलात होते. जम्मू काश्मीरमधील कुपवाडा येथे कर्तव्य बजावत असतांना त्यांना वीरमरण आले. ७ जानेवारी रोजी ते शहीद झाले. '१२ मराठा लाइट इन्फंट्री' या युनिटमध्ये ते होते. देश सेवा देत असतांना त्यांना वीरगती प्राप्त झाली. त्यांचे पार्थिव श्रीनगरवरून दिल्ली, पुढे विशेष विमानाने नागपूर व त्यानंतर मूळ गाव कपिलेश्वर (पो. वडद, ता. अकोला) येथे आणले. वीर जवानाचे पार्थिव गावात दाखल होताच कुटुंबीयांसह उपस्थित नागरिकांच्या अश्रूंचा बांध फुटला. प्रशासनाच्यावतीने तहसीलदार कुणाल झाल्टे, 'मराठा लाईट इन्फ्रंट्री'चे सीएचएम रामेश्वर पाटील, वैभव लहाने यांच्या कुटुंबीयांनी पुष्पचक्र अर्पण केले.

सैन्य दलाकडून मानवंदना देण्यात आली. पोलीस विभागाच्यावतीने बंदुकीच्या तीन फैरी झाडून सलामी देण्यात आली. 'भारत माता की जय', 'वीर जवान अमर रहे' अशा घोषणा देत हजारो नागरिकांनी वीरजवान वैभव लहाने यांना निरोप दिला.

मूळ गावी सैनिकी सन्मानामध्ये अंत्यसंस्कार झाले. यावेळी आजी-माजी सैनिकांनी वीर शहीद जवानाला श्रद्धांजली अर्पण केली, अकोला जिल्हा वीर जवानांची भूमी म्हणून ओळखला जातो. देश संरक्षणासाठी जिल्ह्यातील अनेक जवानांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. देशासाठी कर्तव्य बजावत असतांना वीर जवानांनी दिलेले बलिदान कायम स्मरणात राहील.

# वाशीम हादरले! अज्ञात महिलेची दगडाने ठेचून हत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०वाशिम**

महिलेच्या हत्या प्रकरणामुळे वाशीम शहर हादरले आहे. वाशीम शहरातील रेल्वेस्थानक परिसरातील विश्राम कक्षाजवळ झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी समोर आली. अर्धनग्न अवस्थेत रक्ताच्या थारोळ्यात पडलेला महिलेचा मृतदेह आढळून आला. महिलेवर अत्याचार करून हत्या करण्यात आल्याची चर्चा आहे. या प्रकरणी वाशीम शहर पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा नोंदविण्यात आला. या घटनेमुळे शहरात प्रचंड खळबळ उडाली.

वाशीम शहरातील रेल्वेस्थानकाजवळ एक महिला बेशुद्ध अवस्थेत पडून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलीस पथकाने घटनास्थळावर धाव घेतली. पाहणी करताना विश्राम कक्षासमोरील संरक्षण भिंतीजवळ अंदाजे ४५ वर्षे वयाच्या महिलेचा अर्धनग्न अवस्थेत मृतदेह आढळून आला. महिलेच्या शरीरावर गंभीर जखमा असून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याचे दिसून आले. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला. या प्रकरणी वाशीम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत महिलेची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक अरुण नागरे पुढील तपास करीत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यासह अन्य पुरावे गोळा केले जात आहेत. या घटनेमुळे वाशीम शहर चांगलेच हादरले आहे.

### पुरावे नष्ट करण्यासाठी हत्या?

आरोपीने महिलेवर अत्याचार करून पुरावा मिळू नये, यासाठी ही हत्या केल्याची चर्चा आहे. दरम्यान, वाशीम शहर पोलीस, स्थानिक गुन्हे शाखा आणि रेल्वे पोलीस घटनेचा तपास करीत असून मृत महिलेच्या हातावर छाया मोहन असे नाव आहे. ही मृत महिला बाहेर जिल्ह्याची असल्याची प्राथमिक माहिती आहे.

महिलेचा मृतदेह रेल्वेस्थानक परिसरात असल्याच्या माहितीवरून पथकाने घटनास्थळ गाठले. उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह रुग्णालयात पाठविण्यात आला. मृतदेह अर्धनग्न अवस्थेत होता. उत्तरीय तपासणी अहवाल आल्यानंतर मृत्युचे नेमके कारण व अत्याचार झाला की नाही? हे स्पष्ट होईल, असे वाशीम शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांनी सांगितले.




आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत